cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com  नवी दिशा... नवे विचार.....  email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र  वर्ष – ४  अंक–७९  शनिवार दि.२९ जून २०२४  RNI No.: MAHMAR/2021/85884  NO.L SB/BEED/RNP-206/2024-26  • पाने– ६  किंमत ३ रूपये

## संपादकीय

### गणवेशाचा नियम योग्यच!

शाळा–महाविद्यालयांमध्ये मुस्लिम विद्यार्थिनींच्या हिजाब, नकाब वापरण्यावर बंदी घालण्याचा निर्णय कायदेशीर आहे, असा महत्त्वाचा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी (२६ जून) दिला. चेंबूरच्या ट्रॉम्बे एज्युकेशन सोसायटीच्या ए. जी. आचार्य मराठे महाविद्यालयातील विज्ञान शाखेत दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या नऊ विद्यार्थिनींनी कॉलेजने घातलेल्या हिजाबबंदीला आव्हान दिले होते. हिजाबबंदी ही धार्मिक स्वातंत्र्याची गळचेपी आहे, असा युक्तिवाद विद्यार्थिनींच्या वतीने करण्यात आला होता. न्यायालयाने तो फेटाळून लावला.

### हेमंत सोरेन यांना जामीन मंजूर

नवी दिल्लीः झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना मोठा दिलासा मिळाला आहे. झारखंडमधील कथित जमीन घोटाळ्याप्रकरणी त्यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. झारखंड उच्च न्यायालयाने हा निर्णय शुक्रवारी (दि.२८ जून) रोजी दिला आहे. पाच महिन्यांनंतर तुरुंगात असलेल्या सोरेनची आता सुटका होणार आहे. झारखंड उच्च न्यायालयाने माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना ८.३६ एकर जमिनीच्या बेकायदेशीर ताब्याशी संबंधित मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात जामीन मंजूर केला आहे. सोरेन यांच्यावर अन्य कोणतेही खटले प्रलंबित नसल्यामुळे, सोरेन यांची तुरुंगातून सुटका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. १० जूनच्या सुनावणीनंतर झारखंड उच्च न्यायालयाने सोरेन यांच्या जामीनावरील निर्णय राखून ठेवला होता. त्यानंतर न्यायालयाने सोरेन यांच्या जामीनाला मंजूरी दिली आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर सरकार बळीराजाला पावले; शेतीपंपाला वीज आता मोफत मिळणार

## कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडून शेतकऱ्यांना गिफ्ट; थकीत बीलही माफ



मुंबई । प्रतिनिधी

**विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या घोषणा यंदाच्या बजेटमध्ये करण्यात आल्या आहेत. शेतकरी आणि महिला वर्गांना खुश करण्याचा प्रयत्न या बजेटमधून करण्यात आला आहे. कधी नव्हे ते यंदा शेतकऱ्यांना राज्य सरकार पावले असून कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्याकडून एक प्रकारे शेतकऱ्यांसाठी हे मोठे गिफ्ट आहे. यात एक रुपयात पिकविमा, गायीच्या दुधासाठी अनुदान, कापूस, सोयाबीनसाठी हेक्टरी ५ हजार रुपये अनुदान तर थकीत विजबील माफ करताना साडेसात एचपीपर्यंत शेतीसाठी यापुढे वीज मोफत देण्याची महत्वाची घोषणा अजित पवारांनी केली आहे. याचा राज्यातील ४४ लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे.**

विधानसभा निवडणुकीपूर्वीचा शेवटचा ◀◀ पान २ वर

### साडेतीन कोटी महिलांना मिळणार १६०० रुपये

वार्षिक उत्पन्न २ लाख ६० हजार पेक्षा कमी असलेल्या महिलांना याचा फायदा घेता येणार आहे. राज्यातील साधारण साडेतीन कोटींहून अधीक महिलांपर्यंत ही योजना पोहोचवली जाणार आहे. यातील प्रत्येक लाभार्थी महिलेला १६०० रुपये मिळणार आहेत.



### वारकरी बांधवांसाठी...

पंढरपूरच्या वारीचा जागतिक वारसा नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पंढरपूरच्या वारीला जाणाऱ्या मुख्य पालख्यातील दिंडींना प्रति दिंडी २० हजार रूपये. निर्मल वारीसाठी ३६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून देहू–आळंदी ते पंढरपूर या दोन्ही मुख्य पालखी मार्गावरील सर्व वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार

### महाराष्ट्रावर कर्जाचा बोजा अजून वाढणार

- २०२३–२४ मध्ये कर्जाचा डोंगर ७,११,२७८ लाख कोटींवर.
- सरकार वर्षाला देत आहे कर्जावर ४८,५७८ कोटींचे व्याज.
- २०२३–२४ साठी अपेक्षित खर्च २,३१,६५१ लाख कोटी.
- जिल्हा वार्षिक योजनांवरचा खर्च २९ हजार १८८ कोटी.
- २०२३–२४ मध्ये १ लाख ११२ कोटींची परकीय गुंतवणूक शक्य.
- २०२३–२४ मध्ये औद्योगिक विकास ७.६ टक्क्याने अपेक्षित.
- बांधकाम क्षेत्राचा विकासदर १४.५% वरुन ६.२%पर्यंत घसरणार.
- शहरी भागात गृहनिर्माण ३०% घटले,१९.४लाख घरांचे होते उद्दिष्ट.

### शेतकऱ्यांसाठी काय?

शेतकऱ्यांना एक रुपयात पीक विमा योजना कायम करणार. कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना पाच हेक्टरच्या मर्यादित प्रति हेक्टर पाच हजार रुपयांचे अनुदान. गाई दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी प्रति लिटर ५ रुपयाचे अनुदान १ जुलैपासून देण्यात येणार. येत्या दोन वर्षात १६३ सिंचन प्रकल्प पूर्ण होतील. सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्ड करून १५,००० कोटींचे दीर्घकालीन कर्ज मंजूर झालेला आहे. ३२०० कोटी रुपयांचा कार्यक्रम दुष्काळी भागात पाणी पोहचवण्याचा राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा विज पुरवठा करण्यासाठी १५,००० कोटी रुपयांची व्यवस्था करण्यात येत आहे. मागेल त्याला सौरपंप दिला जाणार आहे. संजय गांधी निराधार योजनेला १ हजारावरुन दीड हजार रुपयांचे अनुदान मिळाले. शेती कृषी पंपाचे सर्व थकित बील माफ करण्यात आले. नवीन रुग्न वाहिका खरेदी केल्या जातील. मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना राबवली जाईल.

### महिलांसाठी काय?

– मध्य प्रदेशातील मुख्यमंत्री लाडकी बेहना या योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लागू करत आहोत. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनासाठी २१–६० वयोगटातील महिलांना दर महिना दीड हजार रुपये दिले जातील. जुलै २०२४ पासून ही योजना सुरू करणार असून, यासाठी ४६ कोटी रुपये मंजूर करण्यात येत आहेत. मुलींमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढवण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. यासाठी ८ लाख वार्षिक उत्पन्नाची मर्यादा तसंच आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थिनींना पदवी शिक्षणासाठी १०० टक्के शुल्क माफ करण्यात येणार. स्वयंपाकातील इंधनाचा आणि महिलांच्या आरोग्याचा जवळचा संबंध असतो. गॅस सिलेंडर घराला परवडेल यासाठी पात्र कुटुंबाला वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत दिले जातील. राज्यात १० हजार पिंक रिक्षा महिलांसाठी देण्यात येतील. बस प्रवासात सवलत. मुद्रांक शुल्कात सवलत. वर्षाला एका कुटुंबाला ३ सिलेंडर मोफत दिले जातील. बचत गटाच्या निधीत १५ हजारांहून ३० हजार निधी देण्यात येईल. यावर्षी २५ लाख महिलांना लखपती दिदी बनवण्याचा शासनाचा विचार आहे. आठ लाख रुपयांचे उत्पन्न असलेल्या कुटुंबातील मुलींना व्यावसायिक शिक्षणामध्ये शंभर टक्के सवलत दिली जाणार.

### थापांचा नव्हे तर मायबापांचा अर्थसंकल्प–फडणवीस



अजित पवारांनी मांडलेला अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक असून शेतकरी, महिला, युवा, मागासवर्गीय अशा सर्व घटकांच्या इच्छा पूर्ण करणारा आहे अशी स्तुतीसुमने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उधळली. हा थापांचा अर्थसंकल्प नाही तर मायबापांचा अर्थसंकल्प असल्याचं ते म्हणाले. सरकारने दिलेली सर्व आश्वासने ही निर्धारित वेळेत पूर्ण केली जातील असे आश्वासनही देवेंद्र फडणवीसांनी दिले.

### खोटे नेरेटिव्ह पसरवणारा अर्थसंकल्प–ठाकरे



जनतेने लोकसभेला जो दणका दिला त्यानंतर राज्य सरकारने हे बजेट समोर ठेवलं आहे, पण जनता यांच्या भुलथापाला बळी पडणार नाही. काहीतरी धुळफेक करायची, जनतेला लुबाडायचे काम हे सरकार करत आहे. थापांचा महापूर, आश्वासनाची अतिवृष्टी म्हणजे आजचा अर्थसंकल्प आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या भाषेत बोलायचे झाले तर खोटे नेरेटिव्ह पसरव्याचे काम या बजेटमधून केले आहे, अशा शब्दात उद्धव ठाकरेंनी शिंदे सरकारच्या अर्थसंकल्पावर टोला लगावला.

### ठिगळं लावलेला खोकेसंकल्प–विजय वडेट्टीवार



फसव्या योजनांची ठिगळं लावलेला खोकेसंकल्प आज अर्थमंत्र्यांनी विधानसभेत सादर केला आहे. अडिच वर्ष फक्त घोटाळे, टेंडर, कमिशन, टक्केवारी यातून मालामाल झालेल्या या महाभ्रष्टाचारी सरकारने आता निवडणुका डोळ्यासमोर ठेवून अतिरिक्त अर्थसंकल्पाच्या नावाखाली महायुतीचा निवडणूक जाहीरनामाच सादर केला असल्याची प्रतिक्रिया विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली.

## बजेटमधील टॉप १० घोषणा

**१. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना**

राज्यात लेक लाडकी योजनेसह महिलांना आर्थिकदृष्ट्या मदत करण्यात येत असून नव्या योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू होत असून बजेटमध्ये महिलांसाठी विविध योजना सुरू होणार असल्याची घोषणा करण्यात आली. या योजनेंतर्गत राज्यातील २१ ते ६० वर्षांतील महिलांना दरमहा १५०० रुपये देमार.

**२. वारीच्या प्रतिदिंडीस २० हजार रुपयांचा निधी**

संत श्री तुकाराम महाराजांचं नाव घेत अजित पवारांनी अर्थसंकल्पाची सुरुवात केली. मुख्ममंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती अजित पवार यांनी यावेळी दिली. तसेच, वारीसाठी पंढरीकडे प्रस्थान करणाऱ्या नोंदणीकृत दिंड्यांना, प्रतिदिंडी २० हजार रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. तसेचस, वारीचा प्रस्ताव युनेस्कोकडे पाठवण्यात येणार असल्याचेही घोषित केले.

**३. शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५ हजार रुपयांचे सहाय्य, वीज बिल माफ**

राज्यातील कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रतीहेक्टर ५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. राज्यातील शेती कृषी पंपाचे सर्व थकित बील माफ करण्यात आल्याचेही अजित पवारांनी सांगितले.

**४. मुलींना शिक्षणशुल्क आणि परीक्षा शुल्क माफ**

अभियांत्रिकी, वास्तूशास्त्र, वैद्यकीय तसंच कृषीविषयक अभ्यासाठी प्रवेशीत ८ लाखांपर्यंत उत्पन्न असलेल्या इतर मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलींना शिक्षणशुल्क आणि परीक्षा शुल्क माफ करण्यात येणार आहे. या निर्णयाचा लाभ राज्यातील २ लाख ५ हजार मुलींना होणार असून २०२४–२५ पासून ही योजना सुरू होत आहे.

**५. मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची घोषणा**

अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्प मांडताना मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेची घोषणा केली. या योजनेतून पात्र कुटुंबाना वर्षाला ३ सिलेंडर मोफत देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**६. शुभमंगल योजनेचा निधी वाढवला**

विवाहित मुलींसाठीच्या शुभमंगल योजनेच्या निधीत वाढ करण्यात आली आहे. या घोषणेंतर्गत आता १० हजारांऐवजी २० हजार रुपये निधी देण्यात येणार असल्याची माहिती अजित पवार यांनी दिली.

**७. महिलांना १० हजार पिंक रिक्षा देणार**

राज्यातील महिलांसाठी १० हजार पिंक रिक्षा देण्यात येतील, तसेच नवीन रुग्णवाहिका खरेदी केल्या जातील, अशी घोषणाही अजित पवारांनी केली.

**८. गायीच्या दुधाला अनुदान**

यावर्षी २५ लाख महिलांना लखपती दिदी बनवण्याचा शासनाचा विचार आहे. तर, गाईच्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी प्रति लिटर ५ रुपयाचे अनुदान १ जुलैपासून देण्यात येणार

**९. नवी शासकीय महाविद्यालये स्थापन होणार**

राज्यात १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेची नवी शासकीय महाविद्यालये आणि ४३० खाटांची संलग्न रुग्णालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार, जालना, हिंगोली, धाराशिव, परभणी, नाशिक,जळगाव, अमरावती, बुलढाणा, वाशिम, वर्धा, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, अंबरनाथ येथे ही रुग्णालये उभारण्यात येणार आहे.

**१०. मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना**

मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना जाहीर करण्यात आला आहे. या योजनेनंतर्गत दरवर्षी १० लाख तरुण–तरुणींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच, दरवर्षी १० हजार रुपयांचा स्टायफंड या तरुणांना मिळणार आहे.

## पंकजाताई मुंडे यांच्या मागणीला यश



मुंबई : मध्यप्रदेशात प्रचंड यशस्वी आणि लोकप्रिय ठरलेल्या 'लाडली बहना' योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रात 'लाडकी बहीण' योजना राबवण्याची मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी केली होती. त्या अनुषंगाने आज जाहीर झालेल्या अर्थसंकल्पात ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण'' ही योजना महाराष्ट्र शासनाने घोषित केली असून याकरिता आवश्यक निधीची तरतूद देखील करण्यात आली आहे. उप मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी आज राज्याचा अर्थसंकल्प ◀◀ पान २ वर

## पंढरीच्या वारीपासून शेतकऱ्यांच्या चारीपर्यंत सर्वांना दिलासा देणारा अर्थसंकल्प–धनंजय मुंडे

**मुंबई : राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांनी आज महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर केला या अर्थसंकल्पात पंढरीच्या वारी पासून शेतकऱ्यांच्या चारीपर्यंत सर्व समाज घटकांना दिलासा देणारा व विकासाची दूरदृष्टी असलेल्या हा अर्थसंकल्प असल्याचे मत राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी व्यक्त केले आहे.**

महिला आर्थिक धोरण, महिलांचा विकास, गृहिणींवरील कौटुंबिक ताण तणाव कमी करणे आदी करण्यासह ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२८ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ०.५० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| ज्वारी/हायब्रिड : ३०.०० क्विंटल | २,१९० | २,७५० | २,३९३ |
| मूग : १.०० क्विंटल | ७,२७६ | ७,५०१ | ७,३८८ |
| तूर : ५.५० क्विंटल | ६,००० | ११,११० | ८,८५३ |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: ७.०० क्विंटल | २,०७० | २,६३१ | २,४७३ |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ४.०० क्विंटल | ३,८९१ | ३,८९१ | ३,८९१ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ४,७०० | ६,३०० | ५,५०० |

## कुंडलिक खांडे यांच्या विरोधात बीड, परळीत गुन्हा

बीड/ परळी । प्रतिनिधी

**कुंडलिक खांडे व शिवराज बांगर यांनी पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याबद्दल अपशब्द वापरलेली रेकॉर्डिंग क्लिप व्हायरल झाल्याने दोन जातीमध्ये तेढ केल्याप्रकरणी परळी नगर परिषदेचे गटनेते वाल्मिकअण्णा कराड यांच्या फिर्यादीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात दोघा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच बीडमध्ये पेठबीड पोलिसात खांडे विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.**



लोकसभा निवडणुक निकालानंतर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर समाज माध्यमाचा गैरवापर केल्याप्रकरणी गुन्हे दाखल होत आहेत यातच शिवसेना शिंदे गटाचे बीड जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे व शिवराज बांगर यांच्यातील कथित ऑडिओ क्लिप प्रचंड व्हायरल झाली होती. या ऑडिओ क्लिप मध्ये मी पंकजा मुंडेंना धोका दिला, याबरोबरच धनंजय मुंडे यांची गाडी फोडू, त्यानंतर प्रेस कॉन्फरन्स घेऊन त्यांच्या विरोधात आवाज उठवू अशा पद्धतीचे तेढ निर्माण करणारे वक्तव्य केले होते. मी पंकजाताईंना जाणीवपूर्वक धोका दिला, ३७६ बूथ बजरंग बाप्पांच्या ताब्यात दिले एवढेच नाही तर निवडणुकीत बजरंग बाप्पांना पैसाही पुरविला तसेच धनंजय मुंडे व वाल्मीक कराड यांच्याबाबतीत आक्षेपार्ह शिव्या दिल्याची वक्तव्येही या व्हायरल कथित ऑडिओ क्लिपमध्ये केल्याचे ◀◀ पान २ वर

# शिरूरच्या जिजामाता चौकात मध्यरात्री आगीचे तांडव!

## कोट्यावधीचे साहित्य जळून खाक, महसूल विभागाने केले पंचनामे; आ.सुरेश धस यांची घटनास्थळाला भेट

शिरूर कासार । प्रतिनिधी

**शहरातील बीड – पाथर्डी रोडवरील जिजामाता चौकात गुरूवारी मध्यरात्री लागलेल्या आगीत दहा ते बारा दुकांनाचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये कोट्यावधीच्या** साहित्याची राख रांगोळी झाली आहे. दरम्यान, आगीची माहिती आ.सुरेश धस यांना मिळताच त्यांनी सर्व यंत्रणा कामाला लावल्या.

आष्टी, पाटोदा, पाथर्डी, बीड येथून चार अग्निशमन दलाच्या गाड्या दाखल झाल्या त्यांनी उशिरा आगीवर नियंत्रण मिळवले, मात्र तोपर्यंत कोट्यावधीचे साहित्य जळून खाक झाले. शुक्रवारी सकाळी महसुल विभागाने सविस्तर पंचनामे केले तर आ.धस यांनी घटनास्थळी भेट देऊन व्यापाऱ्यांना ◀◀ पान २ वर



### आगीच्या भक्षस्थानी विविध दुकानं

मध्यरात्री लागलेल्या आगीत संतोष धनराज गटागट यांचे वर्धमान किराणा दुकान (७० लाख नुकसान), सचिन चंद्रकांत जाधव याचे जाधव कॉम्प्यूटर व सिसीटीव्ही चे दुकान (४० लाखाचे नुकसान), कृष्णा चंद्रकांत जाधव यांचे कॉफी सेंटर (साडे पांच लाख), अनिल बाबासाहेब सव्वासे यांचे गोरक्षनाथ किराणा स्टोअर (३२ लाख), शेख जमीर बागवान यांचे ज्युसबार व फ्रुट स्टॉल (६ लाख), नितीन भाऊसाहेब जाधव यांचे ईश्वरी कलेक्शन (४२ लाख), रामेश्वर महादेव घोडके यांचे शिवशंभो ॲग्रो एजन्सी (७५ लाख), शिवाजी पांडूरंग टाचतोडे यांचे कोमल फुटवेअर (५ लाख), विशाल लक्ष्मण सव्वासे यांचे चहा कॉफी सेंटर (४ लाख), याशिवाय दुकानाच्या शेडचीही मोठी हानी झाली आहे. किराणा दुकानात गोडतेलाचे डबे होते हे डबे फुटल्याने चौक व रस्ता तेलाने माखला गेल्याचे दिसून येत होते.

### आज शिरूर तालुका बंदची हाक

शिरूरः नुकत्याच व्हायरल झालेल्या कुंडलिक खांडे यांच्या ऑडिओ क्लिप च्या अनुषंगाने सकल ओबीसी समाज शिरूर कासार यांच्या वतीने आज दिनांक २९ जून रोजी शिरूर तालुका बंद चे आवाहन करण्यात आले आहे. याबाबतचे निवेदन तहसीलदार यांना देण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात सकल ओबीसी समाज शिरूर कासार तालुका यांनी म्हटले आहे की, कुंडलिक खांडे यांनी ऑडिओ क्लिप मध्ये आमचे सकल ओबीसी समाजाचे दैवत तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे आणि वाल्मीक अण्णा कराड यांच्या विषयी वाईट वक्तव्य केले. यामुळे सकल ओबीसी समाजाच्या भावना दुखविल्या गेल्या असून त्याच्या निषेधार्थ शनिवार दिनांक २९ जून रोजी शिरूर कासार तालुका बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सदरील निवेदनावर कालिदास आघाव, राजेंद्र आघाव, बाळू गर्जे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

cmyk

## अग्रलेख

# गणवेशाचा नियम योग्यच!

शाळा-महाविद्यालयांमध्ये मुस्लिम विद्यार्थिनींच्या हिजाब, नकाब वापरण्यावर बंदी घालण्याचा निर्णय कायदेशीर आहे, असा महत्त्वाचा निकाल मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी (२६ जून) दिला. चेंबूरच्या ट्रॉम्बे एज्युकेशन सोसायटीच्या ए. जी. आचार्य मराठे महाविद्यालयातील विज्ञान शाखेत दुसऱ्या वर्षात शिकणाऱ्या नऊ विद्यार्थिनींनी कॉलेजने घातलेल्या हिजाबबंदीला आव्हान दिले होते. हिजाबबंदी ही धार्मिक स्वातंत्र्याची गळचेपी आहे, असा युक्तिवाद विद्यार्थिनींच्या वतीने करण्यात आला होता. न्यायालयाने तो फेटाळून लावला.

हिजाबबंदी योग्य आहे, असा स्पष्ट निर्वाळा न्यायालयाने दिला. या निर्णयाचे पडसाद राज्यभर उमटण्याची शक्यता आहे. कॉलेज व्यवस्थापनाने लागू केलेली हिजाबबंदी आमच्या धार्मिक स्वातंत्र्याचे, गोपनीयतेच्या अधिकाराचे आणि निवडीच्या अधिकाराचे उल्लंघन करणारी आहे. व्यवस्थापनाने केलेली ही मनमानी आहे. आम्ही गेली दोन वर्षे हिजाब, नकाब घालून येत होतो तेव्हा आक्षेप घेतला नाही, मग आजच ही बंदी का? हिजाबबंदीचा निर्णय पूर्णपणे बेकायदेशीर आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्या विद्यार्थिनींनी केला. तर हिजाबबंदीचे समर्थन करताना आचार्य महाविद्यालय व्यवस्थापनाकडून युक्तिवाद करण्यात आला की, महाविद्यालयाच्या परिसरात हिजाब, नकाब आणि बुरख्यावरची बंदी केवळ एक समान ड्रेसकोडसाठी लागू करण्यात आली आहे. मुस्लिम समाजाला लक्ष्य करणे हा त्यामागचा हेतू नाही. ही बंदी सर्व धर्मांच्या विद्यार्थ्यांना लागू आहे.

न्या. ए. एम. चांदूरकर आणि न्या. राजेश पाटील यांच्या खंडपीठाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर हिजाबबंदीचा निर्णय योग्य असल्याचा निकाल देत याचिका फेटाळून लावली. या निकालावर अभ्यास करून निकालाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात जाण्याचा मनोदय याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी बोलून दाखविला. त्यामुळे हिजाबबंदीचा हा वाद पुन्हा चिघळण्याची शक्यता आहे. दोन वर्षांपूर्वी कर्नाटकात हा वाद चिघळला होता. फेब्रुवारी २०२२ मध्ये कर्नाटक राज्यातील शाळांमध्ये हिजाबबंदीचा वाद उफाळून आला होता. हिजाब घालून आलेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील काही मुस्लिम विद्यार्थिनींना महाविद्यालयात प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आला होता. त्यावरून मुस्लिम समाज संतप्त झाला आणि हिजाबबंदीविरुद्ध मुस्लिम महिलांनी आंदोलन सुरू केले. हे लोण काही दिवसांत राज्यातील अन्य शाळा-महाविद्यालयांमध्येही पोहोचले. मुस्लिम समाजाला जशास तसे उत्तर देण्यासाठी हिंदू समाज रस्त्यावर उतरला.

शाळा-महाविद्यालयांमध्ये भगवी ओढणी वापरण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी हिंदू विद्यार्थिनींकडून केली जाऊ लागली. हिंदू व मुस्लिम समाजामध्ये या मुद्यावरून तेढ निर्माण झाली. कर्नाटक सरकारनेही हिजाबबंदी योग्यच असा निर्वाळा दिला. सरकारच्या या निर्णयाविरोधात अनेक याचिका कर्नाटक उच्च न्यायालयात दाखल झाल्या. कर्नाटक सरकारने आपली बाजू मांडताना म्हटले की, शाळा-महाविद्यालयांमध्ये ड्रेसकोडचे पालन करणे सर्वधर्मीय विद्यार्थ्यांवर बंधनकारक आहे. कोणीही शाळा-महाविद्यालयात धार्मिक ओळख दर्शविणारे कपडे घालून येऊ नयेत. शाळा-महाविद्यालयांमध्ये ड्रेसकोडच्या नियमावर देशातून तसेच अमेरिका, पाकिस्तानसारख्या देशांमधून जोरदार टीका झाली होती. मानवी हक्कासाठी लढणाऱ्या संस्था आणि नोबेल पारितोषिक विजेत्या मलाला युसूफझाई आदींनी ड्रेसकोडला विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पडसाद पुन्हा एकदा सर्वदूर उमटण्याची शक्यता आहे. कॉलेजच्या बुरखा, हिजाबबंदीच्या नियमामुळे विद्यार्थ्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत नाही. धर्म, जातीचा विचार न करता गणवेशाचा नियम विद्यार्थ्यांना लागू होतो असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. गणवेश शिस्त राखण्यासाठी असतो. 'शैक्षणिक संस्था स्थापन करणे आणि त्याचे व्यवस्थापन करणे' या मूलभूत अधिकारात गणवेश ठरविण्याचा अधिकार कॉलेजला आहे असे न्यायालयाने म्हटले आहे. विद्यार्थ्यांचा धर्म उघड होऊ नये, हाच गणवेशामागचा हेतू आहे. त्यात शैक्षणिक आणि विद्यार्थ्यांचे हित आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हितासाठी, त्यांच्या करिअरसाठी त्यांनी कॉलेजमध्ये उपस्थित राहणे आवश्यक आहे. इथे मुस्लिम समाजातर्फे एक सर्वसाधारण शंका उपस्थित केली जाते ती अशी की, हिजाबबंदी लागू केल्यास मुस्लिम विद्यार्थिनींचा शैक्षणिक टक्का घसरेल. त्यांचे शाळा-कॉलेजात शिक्षण घेणे थांबेल. इथे सारासार विचार करायला हवा. गणवेशामुळे मूलभूत अधिकारांचे उल्लंघन कसे काय होते? कारण गणवेशाचा नियम सर्वधर्मियांसाठी आहे. एका धर्मासाठी तो मर्यादित नाही. हिजाब परिधान केल्यामुळे आपण शिक्षणात पारंगत होऊ असे नाही आणि गणवेश परिधान केल्यामुळे आपण शिक्षणात पारंगत होणार नाही असेही नाही! मध्य आशियातील मुस्लिमबहुल देशात हिजाब आणि बुरख्यासारख्या इस्लामिक पोशाखावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. संसदेत याबाबत कायदा मंजूर करण्यात आला आहे. जगात बदलाचे वारे वाहत आहेत, बदलत्या जगाबरोबर आपणही आपल्यात बदल करणे योग्य ठरते नव्हे ती काळाची गरज असते. कट्टरतेच्या विचारातून बाहेर पडण्यासाठी जुने टाकून नवे आत्मसात करण्यासाठी काही कठोर निर्णय घ्यावेच लागतात. काही इस्लामिक राष्ट्रे त्यांच्या निरुपयोगी, जुन्या परंपरा टाकून नावीन्याची कास धरताना दिसत आहेत. यावर आपणही विचार करायला हवा. चुकीच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यापेक्षा शिक्षणाविषयी चिंता करणे केव्हाही योग्य राहील.

# प्राचार्य जे.एम.पैठणे एक प्रेरणास्त्रोत

**मधुर आवाज, गोड गळा ,सुंदर व देखने रूप इत्यादी मानवाला मिळालेल्या निसर्ग दत्त देणग्या आहेत. या सर्व देणग्या ज्यांच्याकडे आहेत त्यांना आपण भाग्यवान समजतो परंतु काही देणग्या / गुण या आपण प्रयत्नपूर्वक आणि स्व कष्टाने मिळू शकतो वाचन ,लेखन, मनन आणि चिंतन व जबरदस्त इच्छाशक्तीच्या जोरावर ज्यांनी आपल्या अंगी वक्तृत्वाचा गुण विकसित केला आणि आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटविणारे व्यक्तिमत्व म्हणजे ग्रामीण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नेकनूर येथील प्राचार्य जालिंदर मसुराम पैठणे हे होय . ते प्राचार्य जे. एम. पैठणे या नावाने ते सुपरीचीत आहेत . नियत वयोमानानुसार ३० जून २०२४ रोजी प्राचार्य पैठणे जे.एम . सेवानिवृत्त होत आहेत . त्यांचा सहकारी शिक्षक या नात्याने मी त्यांच्या कार्याचा अल्पसा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.**



पैठणे सरांचा जन्म ७ जून १९६६ रोजी बीड तालुक्यातील लिंबारुई (देवी) सारख्या खेडेगावात झाला . प्राथमिक शिक्षणासाठी त्यांना जवळच असलेल्या ताडसोन्ना या गावी पायी जावे लागे . पुढे ते माध्यमिक शिक्षणासाठी बीड येथे आले .माध्यमिक शिक्षण ते पदवीपर्यंतचे शिक्षण बीड शहरातच झाले .विद्यार्थी शेपासूनच त्यांना वाचन लेखन आणि भाषणाची आवड होती बी .एस .सी .पर्यंत शिक्षण पूर्ण झाल्यानंतर लगेचच सरांनी ग्रामीण माध्यमिक कन्या शाळा नेकनूर येथे १९८७ साली आपल्या सेवेस प्रारंभ केला . सरांची काम करण्याची हातोटी आणि विद्यार्थ्यांविषयी असणारी आंतरिक तळमळ ओळखून संस्थेचे सचिव ॲड जगदीशरावजी शिंदे (भाऊ ) यांनी त्यांची मुख्याध्यापक पदी नेमणूक केली पुढे सरांनी सेवांतर्गत बी.एड . करून मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता प्राप्त केली.

प्रारंभी शाळेत विद्यार्थी संख्या मर्यादित असल्यामुळे पैठणे सरांचे प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष असे. १९८८ साली सरांनी शाळेमध्ये साने गुरुजी कथा कथनमाला सुरू केली या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अवांतर पुस्तक वाचनाची गोडी लागली आणि विद्यार्थ्यांमध्ये व्यासपीठावर येऊन बोलण्याचे धाडस निर्माण झाले. आज छत्तीस वर्षापासून सुरू असलेल्या साने गुरुजी कथाकथन मालेचे वटवृक्षात रूपांतर झालेले आहे कारण शाळेतील माजी विद्यार्थी जेव्हा भेटतात तेव्हा ते अभिमानाने सांगतात सर आपण शाळेत सुरू केलेल्या कथाकथन मालेमुळे कुठल्याही व्यासपीठावर आम्ही आमचे मनोगत बिनधास्त आणि आत्मविश्वासाने मांडू शकतो शाळेत कथाकथन माला सुरू करण्याचा पैठणे सरांचा दुसरा हेतू तरी काय होता ? माझ्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्वाचा गुण विकसित झाला पाहिजे त्या निमित्ताने त्यांचे वाचन चिंतन आणि लेखन झाले पाहिजे साने गुरुजी म्हणतात ना 'करील मनोरंजन जो मुलांचे जडील नाते प्रभुशी तयाचे ' हे ब्रीद लक्षात घेऊन पैठणे सरांनी शाळेत आपले कार्य चालू ठेवले पैठणे सरांच्या प्रत्येक आठवड्याला कथा सांगण्याच्या सवयीमुळे त्यांच्याकडे अगदी भरमसाठ कथांचा संग्रह आहे याला कारण सरांना असणारी वाचनाची आवड ही सुद्धा आहे .

मुख्याध्यापक म्हणून शाळेत काम करत असताना आपण अधिकारी पदावर काम करत आहोत म्हणून शिकणे काही थांबत नसते हे तत्त्व त्यांनी ध्यानी धरून एम ए मराठी केले खरंतर मुख्याध्यापक पदासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता प्राप्त केल्यानंतर ही ते स्वास्थ बसले नाहीत १९९३ -९५ मध्ये त्यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे एम .एड . शिक्षण क्षेत्रातील अतिशय महत्त्वाची असणारी पदव्युत्तर पदवी संपादन केली आणि आपली शैक्षणिक गुणवत्ता सतत वाढवत ठेवली आणि १९८८ ते २००० सालापर्यंत बही :शाल व्याख्यानमालेच्या कार्यवाह म्हणून पैठणे सरांनी केलेले कार्य खरोखरच गौरवस्पद आहे . भविष्यात व्याख्यानमालेच्या माध्यमातून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नामवंत व्याख्याते शाळेत बोलावून त्यांच्या विचारांची महती गंगा विद्यार्थ्यांपर्यंत पोचली एवढेच नाही तर बहिशाल व्याख्यानमालेच्या माध्यमातून विद्यापीठांकडून विद्यार्थ्यांना वाचनीय असणारी असंख्य पुस्तके शाळेच्या वाचनालयाला उपलब्ध करून घेतली तसेच बहिःशाल व्याख्यानमाले अंतर्गत शाळेत महिला शिबिर आणि बालिका शिबिर सारखे विविध कार्यक्रम घेऊन आपल्या कार्याचा प्रभावी ठसा पैठणे सरांनी विद्यापीठातही उमटविला

१९९५ साली माननीय जिल्हाधिकारी साहेबांच्या आदेशानुसार साक्षरतेचे महत्व ग्रामीण भागापर्यंत पोहोचवण्यासाठी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिन मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला त्याचवेळी पैठणे सरांनी स्वतः कल्पकतेतून विद्यार्थ्यांच्या कलाजत्ता तयार करून ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातील साक्षरतेचे महत्व सांस्कृतिककार्यक्रमातून लोकांना पटवून दिले गेले कला जत्ताच्या प्रत्येक कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक या नात्याने पैठणे सर जातीने हजर राहत असत .याच वर्षी सरांच्या मार्गदर्शनाखाली रात्रीचे साक्षरतेचे वर्ग देखील चालत होते या वर्गातून साक्षर झालेले निरक्षर आजही स्वाभिमानाने साक्षर म्हणून मिरवत आहेत.

पैठणे सरांच्या घराशेजारी शाळा आणि शाळे शेजारी घर असल्यामुळे सर शाळेत बसले काय किंवा घरी बसले काय यात त्यांना कधीच फरक जाणवत नसे त्याचा परिणाम म्हणून सरांनी शाळेत रात्रीची अभ्यासिका सुरू केली . रात्र अभ्यासिकेसाठी प्रत्येक आठवड्याला एका शिक्षकाची निरीक्षक म्हणून जबादारी दिली जाई .त्यावेळी फक्त मुलींची शाळा होती तरी रात्रभ्यासिकेला मुलींनी प्रचंड प्रतिसाद दिला शिक्षकांबरोबरच मुख्याध्यापक स्वतः अभ्यासिकेत थांबून विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवत असत . रात्र अभ्यासिकेबरोबरच सरांनी शाळेत रविवार अभ्यासक्रही सुरू केली . रविवार अभ्यासिके साठी सुद्धा सर्व शिक्षकांना रविवार वाटून दिले जात होते . आपल्या वाटयाला आलेल्य रविवारी सर्व शिक्षक निरीक्षक म्हणून आपले काम चोख बजावत होते .हे सर्व खटाटोप करण्याचा पैठणे सरांचा प्रांजळ आणि स्वच्छ हेतू हा आहे की विद्यार्थ्यांनी आपला अधिकाधिक वेळ अभ्या साठी दिला पाहिजे एखाद्या विद्यार्थ्या अभ्यासापासून दुरावला जातो आहे हे आजही त्यांच्या निदर्शनास आले तर त्यांना प्रचंड संताप होतो. याचा परिणाम म्हणून आजही शाळेतील शेकडो विद्यार्थी शिक्षक , प्राध्यापक, डॉक्टर, आय. ए . एस. , आय. ई. एस. आणि स्वतःचे छोटे मोठे उद्योग करून चांगल्या पदापर्यंत पोहोचले आहेत.

पैठणे सरांना आजही अनेक कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून किंवा व्याख्याते म्हणून बोलावले जाते एखाद्या कार्यक्रमाची तयारी असो, व्याख्यानाची तयारी कि वर्ग अध्यापनाची तयारी असो किंवा शिक्षक मासिक बैठकीची तयारी असो जय्यद तयारी निशी पुढे जायचे हा सरांचा शिरस्ता . टेबलावर पडलेला लिफाफा फाडून त्याच्या पाठीमागे असलेल्या कोऱ्या भागावर लिहून व्याख्यानाचे मुद्दे संदर्भ किंवा वर्ग अध्यापनाचे महत्त्वाचे मुद्दे लिहिताना मी सरांना खूप वेळा पाहिले आहे.

शाळा महाविद्यालयांमध्ये प्राचार्य तथा मुख्याध्यापक म्हणून काम करताना सरांनी वेगवेगळी पदे भूषवली आहेत प्रत्येक पदावर काम करत असताना सरांनी आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर संघटन कौशल्यामुळे आपला एक वेगळा ठसा उमटवला नाही तर नवलच .२००१ ते २०१४ पर्यंत बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव म्हणून त्यांनी काम पाहिले. २०१५ ते आज तागायत बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष म्हणून ते कार्य करत आहेत. सन २०२२ मध्ये मराठवाडा मुख्याध्यापक संघाच्या सरचिटणीस पदी त्यांची निवड झाली. त्यापूर्वी त्यांनी सह कोषाअध्यक्षाची ही जबाबदारी पार पाडली. २०१६ साली राष्ट्रीय सुरक्षा दल बीड जिल्हा कार्यवाह पदी निवड झाली होती. याशिवाय मराठवाडा साहित्य परिषदेत जिल्हा शाखा बीडचे कार्यवाह म्हणून तर सत्यशोधक पहिले राज्यस्तरीय साहित्य संमेलन बीडचे सहकार्य वाह म्हणून ही सरांनी आपले जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडलेली आहे.

वरील सर्व कार्याचा आढावा पाहता सरांना अनेक प्रकारचे पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे त्यामध्ये २००१ मध्ये शक्ति प्रतिष्ठान, बीडचा आदर्श शिक्षक पुरस्कार महाराष्ट्र , सायन्स फाउंडेशन अहमदनगरचा उपक्रमशील मुख्याध्यापक तथाआदर्श शिक्षक पुरस्कार , त्यानंतर अतिशय महत्त्वाचा आणि शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा लावणारा पुरस्कार म्हणजे पाच सप्टेंबर २०१४ चा महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार हा होय. त्यानंतर १९ मार्च २०१४ ला नेकनूर पत्रकार संघाच्या वतीने नेकनूर गौरव पुरस्कार देऊन सरांचा सन्मान करण्यात . २४ डिसेंबर २०१५ ला साने गुरुजी जयंती निमित्त राष्ट्रसेवा दलाचा साने गुरुजी सामाजिक शिक्षक हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊनही यांचा सन्मान करण्यात . फेब्रुवारी २०२३ मध्ये शाळेसाठी गौरवाचा समजला जाणारा आणि शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा लावणारा पुरस्कार म्हणजे'' मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर '' या उपक्रमात बीड तालुक्यातून प्रथम पुरस्कार मिळाला आणि शाळेला तीन लाखाचे बक्षीस जाहीर झाले . या शिवाय जर आपली शाळा '' मुख्यमंत्री स्वच्छ शाळा सुंदर शाळा'' या उपक्रमात तालूक्यातून पहिली आली तर नेकनूचे प्रतिष्ठीत नागरीक आणि मकसूद नर्सरीचे मालक मकसुद भाई (पहेलवान) यांनी शाळेला ५०००० रु,. बक्षिस जाहिर केल आणि ते बक्षिस ही शाळेला मिळाले .याशिवाय राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानात मुख्याध्यापकांसाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून'' यशदा '' पुणे येथे प्रशिक्षण घेऊन जिल्ह्यातील मुख्याध्यापकांना प्रशिक्षित करण्याचे काम सरांनी केले.



**श्री.रघुनाथ किसनराव रुचके**
(बी.एस्सी.एम.एड.)
ग्रामीण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नेकनूर ता.जि.बीड

गेल्या ३२ वर्षापासून मी सरांसोबत त्यांचा एक सहकारी म्हणून काम करत असताना आमचे अतिशय प्रेमाचे संबंध राहिले आहेत दिवसभराचा जास्तीत जास्त वेळ आम्ही सोबतच राहत असू त्यामुळे त्यांच्या प्रेमळ स्वभावाचे मला अनुभूती आहे त्यांच्याबरोबर एक सहकारी म्हणून काम करताना अनेक वेळा आमच्यात वैचारिक मतभेदही झाले अनेक वेळा खटके उडाले पण काहीही जरी असले तरी मतभेदाचा राग सरांनी डोक्यात कधी जाऊ दिला नाही. किंवा कोण्या सहकार्याबरोबर खुन्नस धरून सर कधीच वागले नाहीत सरांच्या सोबत राहून मी या शैक्षणिक वातावरणात इतका एकरूप झालो होतो की मी इथे रुजू झाल्यानंतर दोन वर्षांनी मला निवड मंडळाची जिल्हा परिषदची ऑर्डर आली होती पण ती ऑर्डर नाकारून मी इथेच काम करणं स्वीकारलं या घटनेला पैठणे सर साक्षीदार आहेत

अस म्हणतात की प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एक स्त्री असते याप्रमाणे प्राचार्य पैठणे सरांच्या यशस्वीते मागे त्यांच्या पत्नी सौ शांता पैठणे यांचाही मोलाचा वाटा आहे त्यामुळेच तर सर एवढी उंची भरारी घेऊ शकले मुलगी डॉक्टर शुभांगी पैठणे आणि मुलगा चिरंजीव डॉक्टर शुभम पैठणे आणि पत्नी सौ शांता पैठणे असा सरांचा छोटा आणि सुखी परिवार आहे सरांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने त्यांना दीर्घायुष्य आणि निरोगी आयुष्य लाभो अशी शुभेच्छा देऊन थांबतो धन्यवाद

# राज्यातील अनेक भागात जोरदार ते मध्यम पावसाचा अंदाज

## मान्सूनचा प्रवास सुसाट

**पुणे । प्रतिनिधी**

मान्सूनची शुक्रवारी देशाच्या आणखी काही भागात प्रगती झाली. तर राज्याच्या अनेक भागात पुढील ४ दिवस राज्याच्या काही भागात जोरदार पावसाचा अंदाज आहे. तर विदर्भ, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात ठिकठिकाणी पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला. रविवारी कोकण आणि मध्य महाराष्ट्राली घाटमाथा, पूर्व विदर्भात पावसाचा येलो अलर्ट आहे. तर मराठवाडा, खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात ठिकठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाजही हवामान विभागाने दिला. सोमवारी आणि मंगळावारीही हवामान विभागाने कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी जोरदार ते मध्यम पावसाचा अंदाज दिला. तर मराठवाडा आणि खानदेश ठिकठिकाणी हलक्या सरी पडतील, असाही अंदाज दिला. मान्सूनची वाटचाल कायम असून शुक्रवारी अनेक भागात मान्सून पोहचला. मान्सूनने संपूर्ण दिल्ली, मध्य प्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, झारखंड, उत्तराखंड आणि बिहार व्यापला. तर राजस्थान, हरियाना, उत्तर प्रदेशचा आणखी काही भाग व्यापला. मान्सूनची सिमा जैसलमेर, चूरू, भिवाणी, दिल्ली, अलिगड, कानपूर, गाझीपूर, गोंडा, खेरी, मोरादाबाद, देहरादून, उना, पठाणकोट आणि जम्मू भागात होती. मान्सूनच्या प्रगतीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे पुढील २ ते ३ दिवसात मान्सून हरियाना, चंदीगड, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि जम्मूचा उर्वरित भाग व्यापेल. तसेच राजस्थानच्या आणखी काही भागात मान्सून दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

# नीट प्रश्नी संसदेत विरोधकांचा गोंधळ

## दोन्ही सभागृहांचे कामकाज सोमवारपर्यंत तहकूब

**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**मोदी सरकारच्या कार्यकाळातील लोकसभेच्या संसद अधिवेशनाचा (दि.२८ जून) चौथा दिवस होता. विरोधी पक्ष नेत्यांकडून नीट पेपरफुटी प्रकरणाच्या चर्चेची मागणी करीत विरोधी पक्षाने संसद सभागृहात प्रचंड गदारोळ केला. त्यामुळे लोकसभेचे कामकाज सोमवार पर्यंत तहकूब करण्यात आले.**

मोदी सरकारच्या तिसऱ्या काळातील संसदेच्या अधिवेशनाला २५ जूनपासून सुरूवात झाली. यानंतर नरेंद्र मोदी यांच्यासह नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी झाला. त्यानंतर लोकसभा अध्यक्ष म्हणून ओम बिर्ला यांची नेमणूक झाली तर काँग्रेसनेते राहुल गांधी यांची विरोधी पक्ष नेते म्हणून नियुक्ती झाली. शुक्रवारी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील धन्यवाद प्रस्तावावर प्रथम चर्चा करावी असा आग्रह धरला. मात्र विरोधकांनी सभागृहात नीट पेपरफुटी प्रकरणावरून गदारोळ सुरू केला त्यामुळे अध्यक्ष बिर्ला यांनी सभा तहकूब करीत सोमवार १ जुलै सकाळी ११ वाजता पुन्हा लोकसभेचे कामकाज सुरू होईल, असे स्पष्ट केले. काँग्रेस आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभा अध्यक्षांना नीट विषयावर आणि नॅशनल टेस्टिंग एजन्सीद्वारे घेतलेल्या परीक्षांमधील अनियमितता यावर चर्चेला परवानगी देण्याची विनंती केली आणि हा देशातील युवकांचा महत्त्वाचा मुद्दा असल्यावर भर दिला.

# पान १वरून...

पान १वरून...

### निवडणुकीच्या तोंडावर

अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवारांनी मांडला. त्यामध्ये शेतकरी, महिला, युवक आणि सर्व घटकांसाठी महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या. त्यामध्ये महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण या योजनेची घोषणा करण्यात आली तर शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा योजना कायम ठेवण्यात आली आहे. तसेच प्रती दिंडी २० हजार रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच मुंबई, ठाणे आणि नवी मुंबईत पेट्रोल आणि डिझेलवरील मुल्यवर्धित कर आहे, तो पेट्रोल डिझेलवरील कर २४ टक्क्यांवरून २१ टक्क्यांपर्यंत घटवला आहे. शेतकऱ्यांच्या महत्वाच्या घोषणा या अर्थसंकल्पात करण्यात आल्या. यात एक रुपयात पिकविमा योजना पुढेही सुरु ठेवली जाणार आहे. तसेच कापूस, सोयाबीन पिकांसाठी पाच हेक्टरच्या मर्यादेपर्यंत हेक्टरी ५ हजार रुपयाची मदत दिली जाणार आहे. तर थकीत विजबील माफ केले जाणार असून यापुढे साडेसात एचपीपर्यंतच्या सर्व शेतीपंपासाठी वीज मोफत दिली जाणार आहे. तर मागेल त्याला सोलर पंप देण्याची घोषणाही करण्यात आली आहे. यातून राज्यातील ७ लाख शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. तर मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेची घोषणा करण्यात आली असून कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्यामुळे पहिल्यांदाच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वीजबील माफी आणि मोफतचा ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतल्यामुळे शेतकरी वर्गातून त्यांचे कौतूक होत आहे.

---------------

### पंढरीच्या वारीपासून शेतकऱ्यांच्या चारीपर्यंत

या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीय, सर्वसामान्य, युवा वर्ग आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमतेवर भर देण्यात आला आहे. आजच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून महायुतीच्या सरकारने सन २०२३ २४ सालच्या खरीप हंगामामध्ये सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना अपेक्षित असलेला भाव मिळाला नाही त्यामुळे घोषणा केल्याप्रमाणे सन २०२३ २४ मधील सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा आज करण्यात आली आहे. मुख्यमंत्री कृषी वीज बिल सवलत योजना, तसेच त्यातून मागेल त्याला सौर पंप देणे, त्याचबरोबर आणखी महत्त्वाचे म्हणजे साडेसात हॉर्स पावर पर्यंतच्या कृषी पंपांना आता पूर्णपणे मोफत वीज देणे, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी खास अनुदान, जलयुक्त शिवार टप्पा २ साठी ६५० कोटींचा निधी, शेती क्षेत्रात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर करण्यासाठी संशोधन करण्यास १०० कोटींचा विशेष निधी, नानांनी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजनेचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यात राबवण्यास मान्यता, शेत मालासाठी गाव तिथं गोदाम योजनेस ३४१ कोटी, एक रुपयात पीकविमा योजनेत ई-पंचनामा प्रणाली असे अनेक दिलासादायक निर्णय जाहीर करण्यात आले आहेत. त्यातून राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. स्व.गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ अंतर्गत धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेतील सर्व ८२ वसतिगृहे उभारण्यास देखील मान्यता देण्यात आलाय असून, याबद्दल धनंजय मुंडे यांनी सरकारचे आभार मानले आहेत. दरम्यान शाश्वत शेती व शेतकऱ्यांना दिलासा आणि आर्थिक सक्षमतेवर भर देणाऱ्या, विकासाची दूरदृष्टी असलेल्या अर्थसंकल्प तरतुदींसाठी धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

---------------

### पंकजाताई मुंडे यांच्या

विधीमंडळात सादर केला. शेतकरी, शेतमजूर व सर्व सामान्य नागरिकांच्या हिताच्या हा अर्थसंकल्प होता. दरम्यान, पंकजाताई मुंडे भाजपच्या मध्यप्रदेशात सह प्रभारी असल्याने या राज्यात महिलांसाठी लोकप्रिय ठरलेली 'लाडली बहना' योजना आपल्या महाराष्ट्रात देखील लागू करावी अशी मागणी त्यांनी सरकारकडे वारंवार केली होती, त्यांच्या या मागणीची दखल घेऊन राज्य सरकारने आजच्या अर्थसंकल्पात २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना प्रत्येकी दरमहा दीड हजार रूपये देणारी ''मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण'' योजना लागू करण्याची घोषणा केली. एवढेच नव्हे तर यासाठी निधीची तरतूद देखील केली आहे. ही योजना लागू झाल्याने राज्यातील तमाम महिला वर्गात आनंद व्यक्त होत असून महिलांनी पंकजाताईंच्या मागणीला यश आल्याबद्दल त्यांचे आभार मानले आहेत.

--------------

### शिरूरच्या जिजामाता चौकात

नुकसान भरपाई बाबत प्रयत्न करू असे सांगितले. गुरूवारी रात्री अचानक मध्यरात्री साडेबाराच्या दरम्यान एका दुकानाला आग लागून धूर निघत असल्याचे निदर्शनास आले. यावेळी बंदोबस्तावर असलेल्या पोलीसांच्या ही बाब लक्षात आली. त्याचबरोबर शहरातही ही वार्ता पसरली आणि मोठ्या संखेने चौकात जनसमुदाय जमा झाला. भ्रमणध्वनीवरून आ.धस यांना आगीची माहिती मिळताच त्यांनी तातडीने चारही ठिकाणाहून अग्निशमनदलच्या गाड्या रवाना केल्या. दरम्यान आगीने दहाबारा दुकानाला कवेत घेत दुकानातील विक्रिचे साहित्य, फर्निचर याचा कोळसा केला. प्रथम दर्शनी शॉटसर्किटने ही आग लागल्याचे पंचनाम्यात नमुद केले आहे. शुक्रवारी सकाळीच आ.धस हे घटनास्थळी हजर झाले. क्षतीग्रस्त व्यापाऱ्यांना धीर देत नुकसान भरपाई बाबत प्रयत्न करू, असे आश्वासन दिले.

**आग आटोक्यात आणन्यासाठी शेकडो हात धावले !**

आगीची वार्ता समजताच नगरपंचायतची सर्व यंत्रणा, नगरसेवक व शहरातील नागरिकांचे शेकडो हात मदतीला धावून आले होते. शहरात प्रथमच एवढी मोठी सामुहिक मोठी हानी या आग्नीकांडामुळे झाली असल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

-------------

### कुंडलिक खांडे यांच्या

दिसून येते. ही व्हायरल झालेली ऑडिओ क्लिप व यातील संवाद शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे व शिवराज बांगर यांच्यामधील असल्याचे समोर आले आहे. या व्हायरल ऑडिओ क्लिप मध्ये धनंजय मुंडे यांच्या गाडीवर दगडफेक करू, त्यांची गाडी फोडू अशा प्रकारची काही सामाजिक तेढ निर्माण करणारी वक्तव्येही ऐकायला मिळतात. या प्रकरणी परळी नगर परिषदेचे गटनेते वाल्मीक कराड यांनी पोलिसात धाव घेतली असून गुरनं. १०३/२०२४ कलम १५३ (अ) ५०५ (२) ३४, भादवी सह कलम ६६ () माहिती तंत्रज्ञान कायदानव्ये कुंडलिक खांडे व शिवराज बांगर यांनी सामाजिक तेढ निर्माण करण्याच्या उद्देशाने वक्तव्ये करून ऑडिओ क्लिप व्हायरल केल्याचा आरोप केल्याची तक्रार दिली. तसेच पेठ बीड पोलिस ठाण्यामध्ये कुंडलिक खांडे यांच्या विरूध्द गुन्हा दाखल झाला असून मनोज जरांगे पाटील यांच्या विषयी एकेरी भाषा वापरून दोन समाजात तेढ निर्माण करणे, धनंजय मुंडे वाल्मिक कराड यांच्या विषयी अपशब्द क्लिप मध्ये वापरले अशी फिर्याद सचिन जाधव यांनी दिली आहे.

## टि.सी.हरवला आहे

योगेश त्रिंबक मांडवे, मु.पो.आर्वी ता.शिरूर कासार जिल्हा बीड याचा बारावी पास दाखला बीड पाथर्डी गाडीने आर्वी ते बीड प्रवास करताना हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधाव.

-::: संपर्क :::-
मो.७४९८०३३६१८

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. २९ जून २०२४


## महिला व बाल विकास विभागाचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्यातील विविध प्रकारच्या अत्याचाराने पिडीत असलेल्या महिलांनी व अशा महिलांकरीता मदत करू इच्छिणाऱ्यांनी विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन महिला व बाल विकास विभागाच्या विभागीय उपायुक्त हर्षा देशमुख यांनी एका प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे. महिला व बाल विकास विभागाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास, ज्युबली पार्क चौक, सिटी सर्व्हे क्र.२९७४, प्लॉट क्र.५/५/५३, पॅरामाऊंट स्टोअरमागे, छत्रपती संभाजीनगर येथे असलेल्या कार्यालया अंतर्गत छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, नांदेड, हिंगोली, लातूर व धाराशिव या जिल्ह्यातील महिलांच्या तक्रारींचे तात्काळ निवारण होण्याच्या दृष्टीने महिलांना त्यांच्या इच्छेनुसार तज्ञ समुपदेशकांमार्फत समुपदेशन करण्यात येणार आहे. तसेच स्थानिक पोलीस स्टेशनकडून सहकार्य घेण्यात येईल.अतिमहत्वाच्या गंभीर स्वरूपाच्या तक्रारी किंवा स्वाधिकार नोंद घेण्याच्या तक्रारीबाबत राज्य महिला आयोगाच्या सल्ल्याने कार्यवाही करण्यात येईल. आयोगाच्या विभागीय कार्यालयाद्वारे प्रस्तावित, नियोजित सुनावणी ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर विभागात येणाऱ्या जिल्ह्यातील विविध प्रकारच्या अत्याचाराने पिडीत असलेल्या महिलांनी व अशा महिलांकरीता मदत करू इच्छिणाऱ्यांनी .. या ईमेलवर किंवा प्रत्यक्ष संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# सभागृहात आणि सभागृहाबाहेर जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहिलो -सुरेश धस

## सुरेश धस यांचा सहा वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाल्याने विधानभवनात निरोप समारंभ

**आष्टी । प्रतिनिधी**

भारत देशाचे सर्वात यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा, भारतीय जनता पार्टी अध्यक्ष जे.पी.नड्डा तसेच माजी मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भा.ज.पा. राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या आशीर्वादामुळे धाराशिव तथा लातूर/बीड या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ कार्यक्षेत्राचा विधान परिषद सदस्य म्हूणन जबाबदारी मिळाली या माध्यमातून धाराशिव बीड आणि लातूर या तीनही जिल्हातील जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न केला सभागृहात आणि सभागृहाबाहेर जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहिलो असे मनोगत आ.सुरेश धस यांनी केले.



धाराशिव,लातूर,बीड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधान परिषदेचा सहा वर्षाचा कार्यकाल पूर्ण झाल्याने विधानभवनात निरोप समारंभ प्रसंगी ते बोलत होते.ते पुढे बोलताना म्हणाले की,वास्तविक पाहता या मतदारसंघात भारतीय जनता पार्टीला यापूर्वी कधीही यश प्राप्त झालेले नव्हते एक आव्हान म्हणून हे स्वीकारले आणि सर्व पक्षश्रेष्ठी मतदारसंघातील जवळच्या कार्यकर्ते यांच्या अथक परिश्रमामुळे विजयश्री खेचून आणला.या माध्यमातून धाराशिव, बीड आणि लातूर या तीनही जिल्हातील जनतेच्या प्रश्नांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न केला .अगदी कोविड-१९ या रोगाच्या प्रादुर्भावामुळे जनतेवर मोठे संकट आले असतानाही कोणतेही कधीही शांत बसलो नाही. सभागृहात आणि सभागृहाबाहेर जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी प्रयत्नशील राहिलो. पक्ष नेतृत्वाने दिलेल्या वेळोवेळी सूचना आणि आदेश प्रमाण मानून प्रधान मंडळाच्या वरिष्ठ सभागृहाच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजूर, ऊसतोडणी कामगार, दूध उत्पादक शेतकरी यांच्यासह सर्वसामान्य जनतेचा विकास साधायचा प्रयत्न केला असे शेवटी धस म्हणाले.बीड-धाराशिव आणि लातूर स्थानिक स्वराज्य संस्थेमधून विधानपरिषद सदस्याचा आ.सुरेश धस यांचा कार्यकाळ नुकताच संपला. विधान परिषदेत सभापती डॉ.नीलमताई गोऱ्हे यांनी विधिमंडळात आयोजित केलेल्या विधानपरिषद सदस्यांच्या निरोप समारंभास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

सुरेश धस यांना देखील मी आमदार म्हणून काम करण्याची संधी दिली. काही काळासाठी त्यांना राज्यमंत्री पदाची संधी देखील मी त्यांना दिली. त्यांनी विविध खात्याची मंत्री पदाची जबाबदारी अतिशय जबाबदारीने सांभाळली. राजकारणात अनेक वर्तुळे त्यांनी पार केली असून तरुणपणात सरपंचपदापासून त्यांनी अनेक पदे भूषवले.
अजित पवार, उपमुख्यमंत्री

सुरेश धस म्हणजे एक चालतं बोलतं विद्यापीठ ...सगळ्या विषयांचा ज्ञान आणि ते पण सर्वसामान्यांच्या बोलीभाषेत त्यांचा आहे धस यांची या सभागृहाला नक्कीच कमी जाणवेल..आमदार धस यांनी देवेंद्रजी फडणवीस यांच्याकडे ची अपेक्षा व्यक्त केली आहे ते नक्कीच देवेंद्रजी ठरवतील मात्र या सभागृहात आमदार सुरेश धस हे असणे हे त्यांचे व्यक्तिमत्व आहे.ते नक्कीच पुढच्या वेळेस या सभागृहात असतील आज मी मनमोकळेपणाने बोलतोय पक्षाच्या विचाराचा प्रोटोकॉल तोडून बोलतोय हे मला नक्कीच कळतेय मात्र त्यांची या सभागृहाला आवश्यकता आहे..
ना.अंबादास दानवे,विरोधी पक्षनेते

सुरेश धस यांना मी खरं म्हणजे मनापासून धन्यवाद देतो त्यांनी एखादा विषय घेतला तो धसाच लावायचा नावाप्रमाणेच..अशी त्यांच्या कामाची पद्धत असून एखादा ज्वलंत विषय जो असतो तो कसा मिटेल त्याला काय केलं पाहिजे त्याला कोणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा त्याच्या संबंधित मंत्र्यांनी केला पाहिजे याचा पाठपुरावा ते करतात हे मी जवळून पाहिला आहे. त्यांनी विधानपरिषद सभागृहात अतिशय चांगले काम केले असून यापुढेही ते करतील.धस यांनी केलेली अपेक्षा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांच्याकडे केली आहे.त्याचा उपमुख्यमंत्री नक्कीच विचार करतील .धस यांच्यासारख्या चांगले सदस्यांची सभागृहाला त्यांची आवश्यकता आहे. त्यांच्या वाचन आणि भाषण शैली देखील चांगली असून त्यांच्या सभागृहातील भाषणाचा नेहमी धसका लोक घेतात. सर्व विषयात रस त्यांचे नाव सुरेश धस.
एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

नुसता अभ्यास नाही तर ते मांडण्याची जी आग्रही वृत्ती आहे ती आग्रही वृत्ती आमदार सुरेश धस यांच्यात असून हे सगळं करत असताना जमिनीशी जी नाळ आहे. अभ्यासू वृत्ती असून चालत नसून त्याला प्रॅक्टिकली असणं फार गरजेचे आहे ते आमदार सुरेश धस मध्ये पाहायला मिळतं आणि ते प्रॅक्टिकल नॉलेज आमदार सुरेश धस यांच्यात आहे. येणाऱ्या काळात आपल्या बाबत जो निर्णय घेयचा आहे तो आम्ही सर्व मिळून नक्कीच घेऊ
ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री

## वंजारी महासंघ युवक आघाडीच्या राज्य सरचिटणीसपदी राजेश नागरे यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने युवक आघाडीच्या निवडी करण्यात येत आहेत, राष्ट्र निर्माणात योगदान ही कर्तव्य आणि जबाबदारी असून नैतिक मूल्य रक्षणासोबतच संस्कृती व संस्कारक्षम पिढीच्या निर्माणसाठी एक पाऊल सामाजिक सांस्कृतिक संस्कृती टिकवण्यासाठी आपण आजवर केलेल्या अनमोल कार्याची दखल घेऊनच, वंजारी महासंघात निवडी केल्या जातात,


त्याच माध्यमातून वंजारी महासंघ युवक आघाडीच्या राज्य सरचिटणीसपदी नाशिक येथील राजेश भाऊ नागरे यांची निवड करण्यात येत असून आपण सुसंस्कृत समाज व संस्कार पिढी घडविण्यासाठी नक्कीच योगदान द्याल आपण यापुढेही सामाजिक क्षेत्रात नवनवीन बदलांसह भावी पिढीला नवी दिशा देण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्य कराल असा विश्वास व्यक्त करून वंजारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष गणेशजी खाडे (विचारवंत,साहित्यिक, लेखक, अध्यात्मिक मार्गदर्शक, तथा संस्थापक अध्यक्ष वंजारी महासंघ) व माननीय खंडेराव मुंडे राज्य संपर्कप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली, वंजारी महासंघ महाराष्ट्र, युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष नितीन ढाकणे यांनी, वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य युवक आघाडीची निवड जाहीर केली आहे आणि लवकरच राज्यातील विविध निवडी जाहीर करणार असल्याचे नितीन ढाकणे यांनी सांगितले.



## हरणांचा वावर वाढला ; शेतकऱ्यांची चिंता वाढली

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील मगरवाडी शिवारात हरणांचा वावर वाढला आहे.हरणांचे कळप पेरणी झालेल्या शेतामध्ये दिवसभर आपले ठाण मांडून आहेत. गेल्या आठवड्यापूर्वीच शेतकऱ्यांनी सोयाबीन, तूर, मूग इत्यादी पिकाची पेरणी केली आहे. भरपूर ओल असल्याकारणाने बियाण्याची चांगल्या प्रकारे उगवण झाल्याचे चित्र तालुक्यातील शिवारात आहे. दुसरीकडे मात्र अन्नाच्या शोधात हरणांचे कळप फिरताना दिसत आहेत. तालुक्यातील मगरवाडी शिवारात बुधवारी सायंकाळी शेतकरी संतोष शिंपले यांच्या शेतात पंचेवीसहून अधिक संख्येने हरणांनी आपला मोर्चा सोयाबीन पिकाकडे वळवल्याचे पाह्यला मिळाले. उगवून आलेले कोवळे सोयाबीन, तुरीचे पीक



हरीण फस्त करत असल्याने शेतक-यांची चिंता वाढली आहे.

दिवसेंदिवस वाढत्या शहरीकरणामुळे आजूबाजूला असलेली दाट झाडी व जंगल मोठ्या प्रमाणावर नष्ट होत आहे. झाडांच्या जंगला ऐवजी उंच उंच इमारती उभा राहिल्याने शहरे सिमेंटचे जंगल झाले. परिणामी वन्य प्राण्यांना वास्तव्यासाठी जागा उरलेली नाही. त्यांना वेळेवर व हवे ते अन्न मिळत नाही. त्यासाठी वन्य प्राणी अन्नाच्या शोधात शहराच्या दिशेने आपला मोर्चा वळवत आहेत. शहरातील संत भगवान बाबा चौकातून जवळगाव रस्त्याला जात असताना शहराच्या काही अंतरावर मगरवाडी शिवार सुरू होतो.ऊ आठवडाभरापूर्वी शेतकऱ्यांनी सोयाबीन, तूर, मूग इत्यादी पिकांची पेरणी केली. सध्या बियाणे चांगल्या प्रकारे उगवून आलेले आहे. मात्र अन्नाच्या शोधात असलेले हरणांचे कळप उगवलेले धान्य फस्त करत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. वन्य प्राण्यांना इतरत्र कुठे अन्न मिळत नसल्याने त्यांनी थेट शेताकडे मोर्चा वळवला आहे. त्याचप्रमाणे अंबाजोगाई शहरात माकडेही अन्न पाण्यासाठी शहरातील अनेक भागात या घरावर त्या घरावर उड्या मारताना दिसत आहेत.

वाढत्या शहरीकरणामूळे जंगलाचा - हास होत आहे. त्यामूळे वन्यप्राणी अन्नासाठी जंगलाच्या बाहेर पडत आहेत. त्यामूळे वनाचे क्षेत्र वाढवणे अत्यावश्यक आहे.

**-एम.एन.गुंड वन परिक्षेत्र अधिकारी, अंबाजोगाई**

## श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलात संस्था वर्धापन दिन साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर सीबीएसई ते महाविद्यालय विभागातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमाची सुरुवात सांघिक पद्य,दिपप्रज्वलन, माता सरस्वती व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन झाली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर हे होते प्रमुख अतिथी केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे तर व्यासपीठावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रकाश दुगड, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी,कार्यवाह अड विश्वास जोशी, महाविद्यालय समितीचे



अध्यक्ष अभय कोकड, प्राथमिक विभागाचे अध्यक्ष पवन मानधने,शिशु विहार चे अध्यक्ष लक्ष्मीकांत जोशी इत्यादी उपस्थित होते.यावेळी गुणवंत विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन करताना प्रमुख अतिथी अमरनाथ खुर्पे यांनी सांगितले की,संस्कारक्षम मानव निर्माणाचे कार्य संस्थेमध्ये सातत्याने केले जाते,ज्ञानाच्या कक्षा रुंदावत चालल्या आहेत अशा परिस्थितीत स्पर्धेत आपले आवाहन टिकवून समाजातील विविध क्षेत्रात संस्थेचे, संकुलाचे विद्यार्थी उल्लेखनीय कार्य करुन आपला ठसा निर्माण करत आहे ही खऱ्या अर्थाने उपलब्धी आहे. सर्व गुणवंत विद्यार्थी यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोप करताना डॉ सुरेंद्र आलुरकर यांनी, संस्था परिचय व वाटचाल,संस्थेचा कुलाचार याविषयी माहिती सांगितली.यावेळी गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात यादी वाचन रतन गिरी, रोहिणी गरड, प्रभाकर बनसोडे, प्रा डॉ कमलकिशोर लड्डा यांनी केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संतोष लिंबकर यांनी केले, वैयक्तिक पद्य धनश्री पटवी, आभार उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे यांनी मानले तर सुत्रसंचलन श्रीमती सुनंदा खांडेकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र रवींद्र खोडवे यांनी सांगितला. यावेळी सर्व संस्था सभासद, गुणवंत विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी, पत्रकार, प्राचार्य डॉ सुहास मोराळे, मुख्याध्यापक संतोष लिंबकर, उपमुख्याध्यापक विठ्ठल काळे, उपप्राचार्य डॉ गजानन होन्ना, युवराज मुळये, अंकुश साबळे, प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने, सर्व विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## उपविभागीय अधिकाऱ्यांनी कुणबी' जात प्रमाणपत्र, एस.ई.बी.सी. प्रमाणपत्र जलद गतीने वितरीत करावे

**सकल मराठा समाजाच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन**

माजलगाव । प्रतिनिधी

धारुर, वडवणी व माजलगाव उपविभाग अंतर्गत उपविभागीय अधिकाऱ्यांनी कुणबी' जात प्रमाणपत्र व एस.ई.बी.सी. प्रमाणपत्र हे अत्यंत धिम्या गतीने सुरू असुन सध्या विद्यार्थीना उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्रांची आवश्यकता असुन उपविभागीय अधिकारी यांनी ज्यांच्या कुणबी नोंदी सापडलेल्या आहेत त्यांना कुणबी व एस.ई.बी.सी जात प्रमाणपत्र जलद गतीने वितरीत करण्याच्या मागणीसाठी



माजलगाव सकल मराठा समाजाच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना दि २८ जुन शुक्रवार रोजी निवेद सादर करण्यात आले.

माजलगाव सकल मराठा समाजाच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना दि २८ जुन शुक्रवार रोजी दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,माजलगाव तालुक्यामध्ये ज्या लोकांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत त्यांना 'कुणबी' जात प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया अतिशय संथ गतीने चालु आहे.सध्या बारावी तसेच नीट परिक्षेचा निकाल लागल्यामुळे विद्यार्थ्यांना वैद्यकिय, अभियांत्रिकी व ईतर अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी 'कुणबी' जात प्रमाणपत्र तसेच 'मराठा' जातीचे एस.ई.बी.सी. प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

परंतू उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयाकडून सदर प्रमाणपत्रे संथ गतीने वितरीत केले जात असल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवु शकते.तसेच ज्यांना प्रमाणपत्रांची तातडीने आवश्यकता आहे त्यांच्याकडून त्यांची आर्थिक लुट करून सदर प्रमाणपत्रे दिले आहे.तरी उपविभागीय अधिकारी यांनी या बाबीचा गांभीर्याने विचार करून सदर प्रमाणपत्रे जलद गतीने वितरीत करण्यात यावीत तसेच विद्यार्थ्यांची होणारी आर्थिक लुट थांबवावी अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे.

## ऐतिहासिक भव्य अश्व रिंगण सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात -स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथे गेल्या अनेक वर्षापासून आयोजित करण्यात येणाऱ्या संतश्रेष्ठ नामदेव महाराज तसेच संतश्रेष्ठ जनाबाई आणि इतर पालख्यांचा भव्य अश्वरिंगण सोहळा शनिवार दिनांक ६ जुलै २०२४ रोजी आयोजित करण्यात आला असून या अश्वरिंगण सोहळ्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. या सोहळ्याचा आनंद या पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन संयोजक व स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा यांनी केले आहे.

अशा प्रकारचा अश्वरिंगण सोहळा मराठवाड्यामध्ये आषाढी यात्रेनिमित्त संपन्न होणारा हा पहिलाच गोल अश्व रिंगण सोहळा आहे. याशिवाय रिंगण सोहळ्याला एक वेगळी पार्श्वभूमी आहे. हा सोहळा नसून वारकरी संप्रदायातील श्रेष्ठ अशा गुरु-शिष्यांच्या भेटीचा योग आहे. भागवत संप्रदायामध्ये आद्य अभंग रचयीता म्हणून संत श्रेष्ठ नामदेव महाराजांची ओळख आहे. संत श्रेष्ठ नामदेव महाराजांनी भागवत धर्माची पताका सर्वदूर पसरवली. अखंड भारतामध्ये संतश्रेष्ठ नामदेव महाराजांनी भागवत धर्माच्या प्रचार आणि प्रसारासाठी अखंडितपणे काम केलं. शीख धर्मातील सर्वश्रेष्ठ गुरु ग्रंथसाहिब या ग्रंथामध्ये संत श्रेष्ठ नामदेव महाराजांच्या रचना समाविष्ट आहेत यावरून त्यांचं थोरपण लक्षात येऊ शकेल. भागवत धर्मामध्ये सर्व जाती-धर्माच्या संतांनी भक्तीचा पाया मजबूत करण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. सर्व बारकऱ्यांचं अधिष्ठान पांडुरंग परमात्मा हाच केवळ श्रेष्ठ असून कर्मकांडाला तिलांजली दिलेली आहे माऊली ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून भगवद्गीतेचा साधा आणि सोपा अर्थ सर्वसामान्य लोकांसाठी खुला केला. माऊलींचे हे कार्य संत श्रेष्ठ नामदेवरायांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून पुढे नेलं. आषाढी वारी निमित्त संत श्रेष्ठ नामदेव महाराजांची पालखी नरसी नामदेव येथून पंढरपूरसाठी प्रस्थान करते तर संत श्रेष्ठ जनाबाई यांची पालखी गंगाखेड येथून पंढरपूरसाठी प्रस्थान करते. या गुरुशिष्यांची पहिली भेट माता योगेश्वरीच अधिष्ठान असणाऱ्या आणि आद्यकवी मुकुंदराज स्वामी यांची समाधी असणाऱ्या, दासोपंतांची कर्मभुमी असणाऱ्या




अंबाजोगाई या पवित्र भूमीमध्ये होते. या गुरुशिष्यांची भेट घडवून आणण्यासाठीच केवळ अंबाजोगाई येथील अश्व रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात येते अश्व रिंगण सोहळा म्हणजे समस्त वारकरी बांधवांना उत्साह देणारा, पांडुरंग रायाचा भेटीची आस वाढवणारा असा सोहळा होतो. या सोहळ्यामध्ये भजन कीर्तनाची असतेच परंतु त्यासोबतच वारकऱ्यांचे पाऊल, हमामा, हुतुतु, कबड्डी, कुस्ती असे विविध खेळ सोहळ्यामध्ये आयोजित केले जातात. या दोन्ही पालख्यांचे स्वागत अंबाजोगाईकरांच्या वतीने संत भगवान बाबा चौक याठिकाणी केले जाते. त्या ठिकाणी अश्व रिंगण सोहळ्यामध्ये आपण सर्वांनी सहभागी व्हावे हे निमंत्रण घेऊन चिचखंडी येल्डा या परिसरातील वारकऱ्यांची दिंडी संत श्रेष्ठ नामदेवरायांच्या पादुकांच्या चरणी लीन होते. संत श्रेष्ठ नामदेवरायांना अश्व रिंगण सोहळ्याचे निमंत्रण दिले जाते आणि मग तेथून सर्व पालख्या विठुनामाचा जयघोष करत अश्व रिंगण सोहळ्यामध्ये सहभागी होण्यासाठी योगेश्वरीच्या मैदानाकडे रवाना होतात. योगेश्वरीचे मैदान प्रतिवर्षी अश्व रिंगण सोहळा पाहण्यासाठी सर्व भाविक भक्तांनी गजबजून गेलेले असते. याची देही याची डोळा हा सोहळा साठवून ठेवण्यासाठी प्रत्येक भाविक भक्तांची धडपड चाललेली असते. अश्व रिंगण सोहळा उत्तरोत्तर संपूर्ण मराठवाड्यामध्ये प्रचलित होत आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने प्रती वर्षाप्रमाणे याही वर्षी नंदकिशोर मुंदडा यांच्या वतीने बाल वारकरी समूह दिंडी नृत्य स्पर्धेचे आयोजन केलेले असून इयत्ता पहिली ते चौथी पाचवी ते सातवी व आठवी ते दहावी अशा तीन गटांमध्ये या स्पर्धा संपन्न होणार आहेत. प्रत्येक गटातील विजेत्या स्पर्धकांना ३१०१ प्रथम पारितोषक २००१ द्वितीय पारितोषक १०१ तृतीय पारितोषक ५०१ उत्तेजनार्थ पारितोषिक व सर्व विजेत्यांना सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी. उत्कृष्ट नियोजन आणि गुरु-शिष्यांच्या भेटीचा अपूर्व योग यासाठी या सोहळ्याची वेगळी ओळख आहे. सर्व भाविकांनी शनिवार दिनांक ६ जुलै २०२४ रोजी दुपारी १ वा. आयोजित बाल वारकरी वेषभुषा स्पर्धेचा व अश्व रिंगण सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष नंदकीशोर मुंदडा, दिलीप सांगळे, प्रकाश बोरगावकर, बाबा महाराज जवळगावकर, दिलीप गीत्ते, बळीराम चोपणे, अनंत अरसुडे, शशिकांत गायकवाड, शैलेश स्वामी, वैजनाथ देशमुख, प्रशांत अदनाक, महारुद्र शास्त्री खाडे महाराज, हभप किसन महाराज पवार, गोविंद महाराज सुक्रे, अमोल महाराज घोडके यांच्या वतीने करण्यात येत आहे संयोजन समितीतील सर्व सदस्य व वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे.

पान ६ वरून...

### नायपर-जेईई परीक्षेत

बोंबले व आकाश फुगनार यांनी पहिल्याच प्रयत्नात नायपर-जेईई २०२४ परीक्षेमध्ये यश मिळवले आहे. त्यांची उच्च शिक्षणाकरिता निवड झाली आहे. या निवडीबद्दल आदित्य शिक्षण संस्थेच्या वतीने संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या हस्ते सर्व विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. आदित्य शिक्षण संस्थेतील प्राचार्य डॉ.संतोष जैन, डॉ. प्राची उदापूरकर, प्रा.रजी अन्सारी यांच्या विशेष प्रयत्नातून विद्यार्थ्यांकडून नायपर-जेईई सारख्या स्पर्धा परीक्षेच्या तयारी करिता विशेष मार्गदर्शन व सराव परीक्षा घेतल्या जातात.

महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता तसेच शैक्षणिक प्रगती साठी विविध उपक्रम सातत्याने राबवले जात आहेत. महाविद्यालयाचे विद्यार्थी राष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करीत आहेत. विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयामार्फत केल्या जाणाऱ्या प्रयत्नाचे संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्य तसेच आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालीका डॉ. अदिती सारडा यांनी समाधान व्यक्त केले. व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.

# कळंब तालुक्यातील सात गावांत सोयाबीन बियाणे उगवलेच नाही

## कृषी विभागाकडून शेतीची पाहणी करून पंचनामे सुरू

कळंब : यंदा वेळेवर पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांनी वेगाने पेरण्या उरकल्या. मात्र काही जिल्ह्यातील काही गावांतून बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी येत असून कळंब तालुक्यातील सात गावातील पंधरा शेतकऱ्याच्या शेतातील सोयाबीन बियाणे उगवले नाही. यात सर्वाधिक महाबीज ६१२ या वाणाचे सोयाबीन बियाणे असून, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळी आली आहे. दरम्यान, कृषी विभागाने बियाण्यांची उगवण न झालेल्या शेतीची पाहणी करून पंचनामे सुरू केले आहेत.

धाराशीव जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी तूर, उडीद, मूग, तीळ या पिकांनंतर सर्वाधिक सोयाबीनची पेरणी केली आहे. यात अनेक ठिकाणी सोयाबीनचे बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी पंचायत समितीकडे केल्या आहेत. कळंब तालुक्यातील बोरगांव (धनेश्वरी), हिंगणगाव, आवाड शिरपुरा, डिकसळ, आडसुळवाडी, तांदूळवाडी, लोहटा (पश्चिम) या गावातील पंधरा



शेतकऱ्यांनी महाबीज ६१२ वाणाचे सोयाबीन उगवले नसल्याची तक्रार केली आहे. त्याची दखल घेऊन कृषी विभागाने पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत करंजकल्ला, बोरगांव धनेश्वरी, आवाड शिरपुरा, हिंगणगाव, डिकसळ आदी शेतकऱ्यांचे पंचनामे उपविभागीय अधिकारी शुक्राचार्य भोसले, तालुका कृषी अधिकारी व्ही. डी. गुडूप, 'महाबीज'चे अधिकारी आर. एम. माने, पंचायत समिती कृषी अधिकारी मोहन बंडगर व कर्मचाऱ्यांनी केले असून, उर्वरित पंचनामे सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. वेळेवर पाऊस न झाल्यामुळे शेतकऱ्यांना मागील काही वर्षात दुबार पेरणी करावी लागली.

आता बियाणे उगवल्यामुळे हे संकट आले आहे. शेतकऱ्यांनी दोन ते दहा एकरवर महाबीजच्या सोयाबीनची पेरणी केली आहे. मशागत व पेरणीसाठी एकरी दहा हजार रुपये खर्च वाया गेला आहे. हा खर्च देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# पावसाचा त्रास टाळण्यासाठी कोकणातील मेंढ्यांचा मराठवाड्याकडे प्रवास सुरू

मेंढ्यांच्या कळपांना कोकणातील पावसाचा सर्वात जास्त त्रास होतो. कोकण पट्ट्यात पावसाची चाहुल लागताच घोड्याच्या पाठीवर संसार लादून घर सोडणारे कोकणातील धनगर बांधव पशुधन जगवण्यासाठी मेंढ्यांचे कळप घेऊन मजल-दरमजल करीत मिरज पूर्वभागात पोहोचला आहे. मेंढ्यांना चरण्यासाठी त्यांचा मराठवाड्यापर्यंत प्रवास होतो.

कोकणातील धनगर बांधवांचा मेंढ्यापालन हा मुख्य व्यवसाय आहे. आठ महिने आपल्या भागात मेंढ्या पालनाचे काम करणारे धनगर बांधव पावसाची चाहुल लागताच स्थलांतराच्या मागे लागतो, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल, गडहिंग्लज, मलकापूर, अक्कोळसह कोकण पट्ट्यातील अनेक भागात जून ते सप्टेंबर या चार महिन्यात पावसाचा जोर असतो. मेंढ्यांना चरण्यासाठी हा कालावधी अडचणीचा ठरतो. पावसाळ्यातील रोगराईपासून बचावासाठी तसेच दलदलीमुळे अडचण होत असल्याने हा धनगर बांधव पावसाळ्यात पशुपालनासाठी सुरक्षित व पावसाचे प्रमाण कमी असलेल्या सांगली, सोलापूर जिल्ह्यात दाखल होतो. या भागातील



शेतकऱ्यांकडून या मेंढ्यांना शेतात बसविण्यासाठी मागणी असते, मेंढ्या बसविण्याच्या बदल्यात शेतकऱ्यांकडून मेंढपाळांना मोबदलाही दिला जातो. सध्या मिरज तालुक्यात दाखल झालेला मेंढपाळ पावसाचा अंदाज घेत सोलापूरच्या दिशेने जात आहे. दिवसभर मेंढ्यांना हिंडविल्यानंतर शेतकर्यांच्या मागणीनुसार मोकळ्या रानात मुक्काम करतात. एका कळपात दोनशेहून अधिक मेंढ्या असतात, असे दोन ते तीन कळप शेतीत बसल्यास मेंढीच्या लेंड्यांचा खताच्या रुपात शेत जमिनीला मोठा लाभ होतो.

चार महिन्यानंतर लागतात परतीचे वेध

कोकण पट्ट्यातील पावसाचा जोर कमी झाल्यानंतर शेकडो किलोमीटर पायपीट झाल्यावर जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीनंतर मेंढपाळ गावाकडे जाण्यासाठी परतीच्या मार्गाला लागतात.

# अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना मंदावली!

## दोन हजाराहून अधिक कामे रखडली

अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारी अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना मंदावली आहे. पाच हजार ५७३ विहिरींच्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता मिळाल्यासही, त्यापैकी दोन हजार ४४७ कामेच सुरू आहेत. उर्वरित कामे रखडल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. दीड ते पाच एकर क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांसाठी ही योजना राबवण्यात येत आहे. यातून शेतकऱ्याला विहीर खोदण्यासाठी चार लाखांचे अनुदान मिळते. ६० टक्के कामे मजुरांमार्फत आणि ४० टक्के कामे यंत्राद्वारे करणे बंधनकारक आहे. योजनेला चांगला प्रतिसाद मिळाल्याने, राज्य सरकारने दोन विहिरींमधील १५० फुटांची अट रद्द केली.

योजनेचे फायदे : शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता होते. दुष्काळातही पिके घेणे शक्य होते. रोजगाराच्या संधी निर्माण होतात. शेतीची उत्पादकता वाढते. अडचणी : कामांची गती मंद आहे. काही शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणी येत आहेत. योजनेबाबत पुरेशी जनजागृती नाही. आवश्यक सुधारणा : कामांची गती वाढवणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन देणे गरजेचे आहे. योजनेबाबत अधिक जनजागृती करणे आवश्यक आहे. अहिल्यादेवी सिंचन विहीर योजना शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आहे. काही तांत्रिक अडचणी आणि कामांची मंद गती यावर मात करून योजना अधिक कार्यक्षमतेने राबवणे गरजेचे आहे.



# रसायनयुक्त मळीचे पाणी वापरण्यापूर्वी होणारे नुकसान

औद्योगिक वसाहतीमधील किंवा साखर कारखान्यातील निघणारे मळीचे पाणी शेतीला फायदेशीर असल्याचे सांगत अनेकजण शेतकऱ्यांची फसवणूक करत आहेत. या गोष्टीला बळी पडून शेतकरी रसायनमिश्रित पाणी टँकरद्वारे शेतात टाकताना दिसून येतात. ते कुठल्या शेतात टाकावे, कुठल्या शेतात टाकू नये, यासाठी जमिनीचे माती परीक्षण झालेले नसते. या अज्ञानामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. मुळात रसायनमिश्रित पाणी कंपनीबाहेर घेऊन जाण्याची किंवा सोडून देण्याची परवानगी पर्यावरण खाते देत नाही. मात्र, सर्रास नियम मोडून मळीचे रसायनमिश्रित पाणी कुठेही सोडून देण्यात येत आहे. याला आळा घालण्याची मागणी पर्यावरणप्रेमी करत आहेत. हे पाणी नष्ट करणे किंवा त्यापासून पोटॅश निर्मिती करणे एवढे दोनच खर्चिक पर्याय साखर कारखाने व डिस्टलरी उत्पादित कंपनीकडे असतात. एमआयडीसीमधून



निघणारे सांडपाणी ट्रिटमेंट करण्यासाठी कोणत्याही इंडस्ट्रीमध्ये ईटीपी प्लांटची उभारणी करण्यात आलेली नाही. औद्योगिक वसाहतीमधील दूषित रासायनिक पाण्यावर प्रक्रिया करण्याचा प्लांट प्रत्येक कंपनीत आहे. मग हे रासायनिक मळीमिश्रित पाणी कारखान्यातून बाहेर येतेच कसे? हा संशोधनाचा विषय झाला असल्याचे पर्यावरण अधिकारी सांगतात.रसायनयुक्त मळीच्या पाण्यामुळे होणारे नुकसान : हे सांडपाणी आजूबाजूचे जलस्रोत व पाळीव प्राणी यांना नुकसानकारक ठरत आहे. रासायनमिश्रित पाण्यात सीओडी व बीओडीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असते. जमिनीत हे पाणी सोडल्यास जमीन नापीक होऊ शकते. बोअर तसेच विहीरीमध्ये मिसळल्यास पाणी पिण्यायोग्य राहत नाही. मुरमाड किंवा क्षारयुक्त जमिनीचा सामू ७ असल्यास मळीचे एकदाच पाणी सोडल्यास उपयुक्त ठरू शकते. मात्र काळ्या कसदार जमिनीत वारंवार सोडल्यास अशा जमिनी नापीक होऊ शकतात. रसायनयुक्त मळीच्या पाण्यात क्लोराइड, सल्फेट, कॅल्शिअम, पोटॅशियम, फॉस्फेट ही घातक रसायने या पाण्यात असतात, यामुळे कॅन्सरसारखे रोग होऊ शकतात. या पाण्यामुळे गर्भधारणेला अडचण निर्माण होऊन जनावरांना धोका निर्माण होऊ शकतो.




### महत्वाच्या घटना

१६१३ : इंग्लंड देशातील महान नाटककार शेक्सपिअर यांच्या लंडन स्थित ग्लोब नावाच्या थियेटरला आग लागल्याने जमीनदोस्त झाले.
१७५७ : बंगालचे नवाब मीर जाफर यांनी बंगाल, बिहार आणि ओडिसा प्रांताचे राज्य सांभाळले.
१८७१ : ब्रिटिश पार्लमेंटने कामगार संघटनांना परवानगी देणारा कायदा केला. यापूर्वी कामगार संघटना स्थापन करणार्यांना व अशा संघटनांच्या सदस्यांना ब्रिटनमधून तडीपार करुन ऑस्ट्रेलियात पाठवले जात असे.
१९७४ : इसाबेल पेरेन यांनी अर्जेंटिनाच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून शपथ घेतली.
१९७५ : स्टीव्ह वोजनियाक यांनी ऍपल -१ संगणकाचे पहिले प्रोटोटाइप तपासले.
१९८० सेशेल्सला (इंग्लंडपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८६ : आर्जेन्टिना ने १९८६ चा फुटबॉल विश्वकप जिंकला.
१९९५ : दक्षिण कोरियातील सेऊल येथे 'सँपूंग डिपार्टमेंटल स्टोअर'ची इमारत कोसळून ५०२ जण ठार तर ९३७ जखमी झाले.
१९९६ : मेक्सिको देशांत आयोजित फुटबॉल विश्वचषक अर्जेंटिनाने जिंकला.
२००१ : ज्येष्ठ शास्त्रज्ञ कृष्ण दामोदर अभ्यंकर यांना एम. पी. बिर्ला पुरस्कार जाहीर
२००१ : पण्डित हृदयनाथ मंगेशकर यांना 'नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार' जाहीर
२००७ : ऍपल ने आपला पहिला मोबाईल फोन, आयफोन प्रकाशित केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९३ : प्रोपेलर चे शोधक जोसेफ रोसेल यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १८५७)
१८६४ : शिक्षणतज्ज्ञ व वकिल आशुतोष मुखर्जी यांचा जन्म.
१८७१ : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर नाटककार, वाङ्मय समीक्षक व विनोदी लेखक (मृत्यू: १ जून १९३४)
१८९१ : डॉ. प. ल. वैद्य प्राच्यविद्यासंशोधक (मृत्यू: २५ फेब्रुवारी १९७८)
१८९३ : प्रसंत चंद्र महालनोबिस भारतीय संख्याशास्त्राचे जनक, 'इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्युट' चे संस्थापक (मृत्यू: २८ जून १९७२)
१९०१ : प्रसिद्ध भारतीय क्रांतिकारक तसचं, काकोरी व दक्षिणेश्वर बॉम्बहल्ला प्रकरणांचे सुत्रदार राजेंद्र लाहिरी यांचा जन्मदिन.
१९०८ : प्रतापसिंग गायकवाड बडोद्याचे महाराज (मृत्यू: १९ जुलै १९६८)
१९२२ : रोमानियन वंशीय सर्बियन कवी वास्को पोपा यांचा जन्मदिन.
१९३४ : कमलाकर सारंग रंगकर्मी, निर्माते, दिग्दर्शक व लेखक (मृत्यू: २५ सप्टेंबर १९९८)
१९४५ : चंद्रिका कुमारतुंगा श्रीलंकेच्या ५ व्या राष्ट्राध्यक्षा
१९४६ : पनामाचे राष्ट्राध्यक्ष अर्नेस्टोपेरेझ बॅलादारेस यांचा जन्म.
१९५६ : पोर्तुगालचे पंतप्रधान पेद्रोसंताना लोपेस यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७३ : बंगाली कवी मायकेल मधुसूदन दत्त यांचे निधन. (जन्म: २५ जानेवारी १८२४)
१८९५ : थॉमस हक्सले ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ, विज्ञानकथालेखक आणि डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा खरा समर्थक (जन्म: ४ मे १८२५)
१९६१ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते आणि भारताचे पहिले संरक्षणमंत्री सरदार बलदेव सिंह यांचे निधन.
१९६६ : दामोदर धर्मानंद कोसंबी प्राच्यविद्या पंडित, गणितज्ञ, विचारवंत व इतिहासकार (जन्म: ३१ जुलै १९०७)
१९८१ : दिगंबर बाळकृष्ण तथा दि. बा. मोकाशी साहित्यिक (जन्म: २७ नोव्हेंबर १९१५)
१९९२ : अल्जेरियाचे राष्ट्राध्यक्ष मोहंमद बुदियाफ यांचे निधन.
१९९२ : शिवाजीराव भावे सर्वोदयी कार्यकर्ते (जन्म:)
१९९३ : विष्णुपंत जोग 'चिमणराव-गुंड्याभाऊ' मधील गुंड्याभाऊची भूमिका अमर करणारे गायक अभिनेते (जन्म:)
२००० : कॅप्टन वासुदेव श्रीपाद बेलवलकर ऐतिहासिक कादंबरीकार (जन्म: १८ फेब्रुवारी १९११)
२००३ : कॅथरिन हेपबर्न हॉलिवूड अभिनेत्री (जन्म: १२ मे १९०७)
२०१० : प्रा. शिवाजीराव भोसले विचारवंत, वक्ते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: १५ जुलै १९२७)
२०१६ : प्लास्टिक कलेसाठी प्रसिद्ध भारतीय पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण पुरस्कार तसचं, कालिदास सन्मान प्राप्त कलाकार के.जी. सुब्रमण्यम यांचे निधन.


# गोगलगायीचा प्रादुर्भाव वाढतोय, वेळीच करा उपाय!

भाजीपाला आणि विविध फळबागेमध्ये शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. रोप अवस्थेतच गोगलगायी हल्ला करते आणि पिकांचे मोठे नुकसान करते. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्वरित कारवाई करणे गरजेचे आहे.

गोगलगायी ओळखणे : ही निशाचर किड आहे, रात्रीच्या वेळी सक्रिय असते. ती पानासहीत पूर्ण रोप खाऊन टाकते. शंख असलेला मऊ, चिवट शरीर.

नियंत्रण उपाय : शेताचे बांध स्वच्छ ठेवा. गोगलगायी लपण्यास जागा मिळू नये. गोगलगायी गोळा करा. सायंकाळी किंवा सकाळी गोगलगायी गोळा करून साबणाच्या पाण्यात बुडवून मारा. मीठ-चुना पद्धत : मोठ्या गोगलगायी प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ/चुना टाकून बंद करा. गोगलगायी मिठ/चुन्याच्या संपर्कात येऊन मरतील. आमिष पद्धत: गवत/भाजीपाला अवशेषांचे ढीग तयार करून गुळाच्या पाण्यात भिजवून ठेवा. गोगलगायी आश्रयासाठी येतील आणि सूर्योदयानंतर त्यांचा नाश करा. लहान गोगलगायीसाठी: मीठाची फवारणी किंवा कॅल्शियम क्लोराईडचा वापर करा. तंबाखू/चुना बांध: शेताभोवती ५ सें.मी. रुंदीचा तंबाखू () भुकटीचा/चुन्याचा पट्टा टाका. झाडांवर बोर्डो पेस्ट: झाडाच्या खोडाला १०% बोर्डो पेस्ट लावल्यास गोगलगायी झाडावर चढत नाही. मेटाल्डिहाईड (स्नेलकिल): गोगलगाय नाशकाचा वापर करा. सोयाबीन/कापूस: २ किलो प्रति एकर. फळबाग: प्रति झाड १०० ग्रॅम. पपई/झेंडूसाठी: मेटाल्डिहाईडच्या गोळ्या पपईच्या पिवळ्या पानांजवळ ठेवा. घरगुती आमिष: १० लिटर पाणी, २ किलो गूळ आणि २५ ग्रॅम यीस्ट यांचे मिश्रण बनवा. ५० किलो गव्हाच्या/भाताच्या कोंड्यात मिसळून १०-१२ तास आंबवून घ्या. ५० ग्रॅम थायामिथोक्झाम मिसळा. ढिगाच्या स्वरुपात किंवा बांधाच्या कडेने पट्टा स्वरुपात टाका. सावधानगिरी: वरील उपाययोजना करताना प्लास्टिक हातमोजे घाला. मुले आणि प्राण्यांना आमिषापासून दूर ठेवा.

एकत्रित प्रयत्न : शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिकरित्या उपाययोजना केल्यास गोगलगायीचे नियंत्रण अधिक प्रभावीपणे होईल.



# सरसगट पीककर्ज माफी करिता किसान सभेचे धरणे

## विविध प्रश्नाला घेऊन शेतकरी शासन दरबारी



बीड । प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे व मागील हंगामात पडलेल्या दुष्काळामुळे शेतकरी अत्यंत अडचणीत आला असल्याने नियमितपणे कर्ज फेडणाऱ्या परंतु निसर्गाच्या अवकृपे पीक कर्ज न भरलेल्या शेतकऱ्यांना सरसगट विनाअट पीक कर्ज माफी द्यावी यासह शेतकऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्नावर अखिल भारतीय किसान सभेकडून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.याप्रसंगी जिल्ह्यातील शेकडो शेतकरी यावेळी उपस्थित होते.

मागील हंगामातील सोयाबीन पिकाचे उर्वरित पीक विमा वाटप करण्यात यावा,दूध उत्पादक शेतकऱ्यांना भिकेला लावणारा दूध भुकटी आयात धोरणाला प्रतिबंध घालावा,रबी पीक विम्याचे वाटप करण्यात यावे,१५ जुलै पूर्वी मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना विना अटी, शर्ती शासनाच्या नियमानुसार पीक कर्ज देण्यात यावे,नियमित पीक कर्जाची फेड करणाऱ्या व अडचणीमुळे पीक कर्ज फेडू न शकलेल्या शेतकऱ्यांचे संपूर्ण पीफकर्ण सरसकट विनाअट माफ करावे,केंद्र सरकारने घोषित केलेल्या पिकांच्या एम. एस. पी. ची किंमत वाढवून देण्यात यावी, राज्यात भावांतर योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी,शेतकऱ्यांनाही राज्य सरकारकडून शेतकरी सन्मान निधीची रक्कम योजना सुरू केलेल्या वेळेपासून सुरुवातीपासून देण्यात यावी, उसाचे चुकारे ज्याही कारखान्यांकडे प्रलंचित आहेत त्यांनी विना विलंब अदा करावेत.शेतकऱ्यांना भूमिहीन करणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यात यावा, जिल्ह्याभरातील ठिकठिकाणचे गावठाण फिडर पावसाळ्यापूर्वी बसवून कृषी वीज पुरवठा सुरळीत करण्यात यावा अशा शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नावर किसान सभेकडून शुक्रवार दि २८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

किसान सभा बीडचे जिल्हाध्यक्ष एड.अजय बुरांडे,माजी जिल्हा परिषद सभापती तथा शेतकरी चळवळीचे नेते प्रभाकर वाघमोडे, माजी न्यायमूर्ती बी.आर.तिडके,कॉ.काशीराम सिरसाट,कॉ.मुरलीधर नागरगोजे,कॉ.सुदाम शिंदे,कॉ.कृष्णा सोळंके,कॉ.पप्पू सोळंके,कॉ.राजाभाऊ बादाडे,कॉ.जगदीश फरताडे,कॉ.भगवान बडे यांच्या सह अनेकांनी उपस्थित शेतकऱ्यांना या धरणे आंदोलन प्रसंगी संबोधित केले.या धरणे आंदोलन प्रसंगी किसान सभा बीड चे विविध पदाधिकारी यांच्यासह जिल्ह्यात शेकडो शेतकरी उपस्थित होते.

## थोडक्यात



### अविनाश पाठक यांनी जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला

बीड : अविनाश पाठक यांनी आज बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार दीपा मूधोळ मुंडे यांच्याकडून स्वीकारला. बुधवारी दिनांक २६ जून रोजी सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव सेवा यांनी अविनाश पाठक यांच्याकडे जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार सोपविण्याबाबतचे आदेश काढले होते. त्या आदेशाप्रमाणे आज दीपा मुधोळ मुंडे यांनी जिल्हाधिकारी पदाचा पदभार श्री पाठक यांच्याकडे आज सोपविला. तत्पूर्वी श्री. पाठक यांनी सकाळी आपल्या जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार संगीता देवी पाटील यांना सोपविला. याप्रसंगी परिविक्षाधीन जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, जिल्हा परिषदेच्या नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, कविता जाधव, महेंद्र कुमार कांबळे यासह वेगवेगळे विभागाचे विभाग प्रमुख तसेच कर्मचारी उपस्थित होते.

### पाटोदा न्यायालय येथे कायदे विषयक जनजागरण शिबीर

फयाज सय्यद

पाटोदा : पाटोदा दिवाणी न्यायालय येथे दिनांक २७ जून २०२४ रोजी सकाळी साडेदहा वाजता कायदेविषयक जनजागरण शिबिर आयोजित करण्यात आले होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाटोदा दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती एस.एन.निकम मॅडम तसेच प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा सहदिवाणी न्यायाधीश श्रीमती ए.ए.पाटील मॅडम व पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष विधीज्ञ एस एस कोठेकर हे उपस्थित होते . कायदेविषयक शिबिर प्रसंगी बालकांच्या मोफत आणि सक्तीचा शिक्षण अधिनियम २००९ याविषयी विधिज्ञ आर.जी. औटे साहेब यांनी तर राईट ऑफ रिजनेबल रेसिडेन्स या विषयावर विधीज्ञ एस.एन.घुमरे यांनी मार्गदर्शन केले तसेच याप्रसंगी लोकअदालत या विषयावर पाटोदा दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती एस.एन.निकम मॅडम यांनी लोकन्यायालय याचे महत्त्व विशद करून लोकन्यायालयात तडजोडीने मिटलेल्या तंटा हा पक्षकारांच्या अपेक्षेप्रमाणे निकाल असतो आणि चर्चेतून अनेक वाद कायमस्वरूपी सहज मीटू शकतात व समाजात शांतता सुव्यवस्था अबाधित राहते यासाठी पक्षकार बंधूंनी लोकन्यायालयात जास्तीत जास्त प्रकरणे सामंजस्याने आपसात तडजोड करून मिटवावीत अशा प्रकारचे आवाहन केले याप्रसंगी पाटोदा न्यायालयाचे विधीज्ञ एस.एम. कोल्हे , विधीज्ञ एन.जी.जाधव विधीज्ञ ए.एम.जगदाळे,विधीज्ञ ऋषिकेश डबीर,विधीज्ञ अविनाश जगदाळे, विधीज्ञ आर. एस.घुले, विधीज्ञ यु.बी. जाधव, विधीज्ञ वैद्य.ए एस,विधीज्ञ एस. आर.नागरगोजे,विधीज्ञ बाळासाहेब जावळे, विधीज्ञ पठाण,विधिज्ञ एस बी जावळे यांनी सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले याप्रसंगी वकील संघाचे सर्व विधीज्ञ न्यायालयीन कर्मचारी व पक्षकार बांधव हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

देशातील नामांकित शैक्षणिक संस्थेमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्यातील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेसाठी सन २०२४-२५ करिता विद्यार्थ्यांकडून जाहिरातीद्वारे अर्ज मागविण्यात आले आहेत. जवळच्या काळात योजनेअंतर्गत पालकांच्या कुटुंबाच्या उत्पन्न मर्यादित तसेच जागांमध्ये वाढ झाल्यास त्यानुसार जाहिरातीमध्ये आवश्यक ते बदल करण्याची सुधारणा करण्याचे व फेर अर्ज मागविण्याच्या अधिकार शासन राखून ठेवत आहे. सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षाकरिता पात्र विद्यार्थ्यांकडून परदेश शिष्यवृत्तीसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. वेबसाईटवरून अर्ज डाऊनलोड करून तो परिपूर्ण व आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक २७ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत पोस्टाने किंवा समक्ष समाज कल्याण आयुक्तालय ३ ,चर्च रोड पुणे पिन कोड ४११००१ येथे सादर करावेत.

योजनेच्या प्रमुख अटी व शर्ती:- महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील पदव्यूत्तर,पदवी, पदव्युत्तर, पदविका आणि पी.एच.डी.साठी अद्यावत २०० च्या आतील प्रदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या ७५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येईल. या योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे,कुटुंबाचे विद्यार्थी नोकरी करीत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरून सर्व मार्गाने मिळणारे मागील आर्थिक वर्षातील नोकरी असल्यास त्याचे स्वतःचे वार्षिक उत्पन्न रुपये ८.०० लाखापेक्षा जास्त नसावे. या योजनेचा लाभ एका कुटुंबातील एका विद्यार्थ्यास फक्त एकदाच घेता येईल. एकाच कुटुंबातील एकापेक्षा जास्त मुलांना ही शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. सदरची शिष्यवृत्ती एकाच वेळेस मान्य करण्यात येईल. एकापेक्षा जास्त वेळेस विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र असणार नाही. अर्जाचा नमुना व अधिक सविस्तर माहितीसाठी (जलद दुवे-रोजगार) या संकेतस्थळाला भेट द्यावी. सदर योजनेच्या सामाजिक न्याय विभागाच्या शासन निर्णय दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ व दिनांक ९ नोव्हेंबर २०२३ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार तसेच नियोजन विभागाच्या शासन निर्णय २० जुलै २०२३ मधील अटी व शर्ती लागू राहतील. या शिष्यवृत्तीसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे आयुक्त ओमप्रकाश बकोरिया आणि प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग छत्रपती संभाजी नगरच्या जयश्री कवडे यांनी केले आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख गुरुवार दिनांक १२ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत आहे.

## डॉ. काकासाहेब पोकळे यांची प्रोफेसरपदी पदोन्नती

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. काकासाहेब गंगाधर पोकळे यांची नुकतीच प्रोफेसरपदी पदोन्नती झाली आहे.डॉ. काकासाहेब पोकळे हे गत २८ वर्षांपासून राज्यशास्त्र विषयाचे अध्यापक म्हणून संस्थेत कार्यरत आहेत. ते गेल्या १२ वर्षांपासून राज्यशास्त्र विषयाचे संशोधन मार्गदर्शक असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली ७ विद्यार्थ्यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणावर उत्तम कार्य केलेले आहे व विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आलेले आहे.

डॉ. पोकळे यांच्या पदोन्नतीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आहे. उपप्राचार्य प्रोफेसर किशोर मचाले, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. सतीश माउलगे, पदव्युत्तर विभाग संचालक प्रोफेसर गणेश पाचकोरे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनोजकुमार प्रकाश, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड. कार्यालय अधिक्षक अशोक पवार यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. प्रोफेसरपदी पदोन्नती झाल्याबद्दल संस्थेचे सचिव डॉ. भारतभूषण क्षीरसागर, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, सहसचिव डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. सारिका क्षीरसागर, डॉ. विश्वंभर देशमाने, डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. सिद्धार्थ जाधव यांनी डॉ. पोकळे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## धारूरमध्ये वसतीगृह चालकाकडून खेळला जातोय विद्यार्थ्यांच्या जीविताशी खेळ

### तालुक्यातील वसतीगृहाचे ऑडिट करण्याचे होतेय मागणी

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यामध्ये दहा ते बारा अनुदानित व विनाअनुदानित वस्तीग्रह आहेत . या वस्तीगृहात विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भौतिक सुविधांचा वनवा तर आहेच परंतु विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण दिले जात असल्याने खाजगी तसेच विविध योजनेतून सुरू असलेल्या वस्तीग्रह चालकाकडून विद्यार्थ्यांच्या जीविताशी खेळ खेळला जात असल्याने धारूर तालुक्यात असलेल्या वस्तीग्रहाचे ऑडिट करण्याची मागणी होत आहे.

१५ जून पासून शैक्षणिक सत्र सुरू झाले आहेत . विद्यार्थ्यांच्या राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून वस्तीग्रहे ही सुरू करण्यात आली आहेत . धारूर तालुक्यात विविध योजनेच्या माध्यमातून अनुदानित व विनाअनुदानित दहा ते बारा वस्तीग्रह चालतात .या वस्तीग्रहांवर कोणाचेच लक्ष नसल्याने अनागोंदी कारभार सुरू आहे . या वस्तीग्रहावर विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या भौतिक सुविधा यात झोपण्याची व्यवस्था, आंघोळीची व्यवस्था , शौच्छालयाची व्यवस्था, अभ्यास करण्याची व्यवस्था अशा व्यवस्थांची वानवा असून विद्यार्थ्यांच्या संख्येच्या तुलनेत स्वच्छालये कमी आहेत . काही ठिकाणी वस्तीगृह रस्त्यालगत आहेत त्यामुळे विद्यार्थ्यांना वाहतुकीचा धोका आहे तर काही वस्तीगृहात मुलं मुली एकत्र राहत आहेत . काही ठिकाणी वस्तीग्रह अनुदानित असताना पालकांकडून पैसे घेतले जात आहेत . या सर्व बाबीकडे शिक्षण विभाग दुर्लक्ष करीत आहे . त्यामध्ये पालकांचे मोठे शोषण होत असून आर्थिक लूटही होत आहे . तसेच वस्तीग्रहावर विद्यार्थ्यांना दर्जाहीन जेवण दिले जात असल्याने विद्यार्थ्यांच्या प्रकृतीत बिघाड होऊन त्यांच्या जिवीतास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही . धारूर तालुक्यात सुरू असलेल्या विविध योजनां च्या वस्तीग्रहांची तपासणी केल्यास मोठे दोष आढळून येवू शकतात . बोगस चालणारे वस्तीग्रह रद्द करण्याची मागणी पालकातून होत आहे .

## सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना दिलेला शब्द कधी पाळणार?-घोडके

बीड । प्रतिनिधी

सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांना आरोग्याच्या ज्या काही योजना नोकरीवर असतांना मिळत होत्या त्या योजना सेवानिवृत्त झाल्यावर देखील मिळाव्यात अशी मागणी २०१९ मध्ये त्यावेळचे मुख्यमंत्री तसेच आताचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली असता त्यांनी लवकर दखल घेवू व अंमलबजावणी होवून जाईल असे छत्रपती संभाजीनगर येथे आश्वासन दिले होते मात्र त्यांचे आश्वासन हवेतच विरले की काय? अशी शंका उपस्थित होत आहे. या मागणीसाठी त्यानंतर जिल्हाधिकारी, पालकमंत्री यांना देखील निवेदन देण्यात आली परंतू कोणीही दखल घेत नसल्याने सर्व सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांना सोबत घेवून आमरण उपोषणाला बसणार असल्याचे सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी संतराम घोडके पाटील यांनी पत्रकाद्वारे कळविले आहे.

राज्यातील अनेक सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांना निवृत्ती नंतर जोखमीची नोकरी केल्यामुळे उतारवयात आरोग्याचे त्रास सुरु होतात ते त्रास अत्यंत खर्चीक असतात त्यामुळे सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी यांच्या विविध प्रश्ना संदर्भात तसेच त्यांना आरोग्य विभागाच्या नोकरीवर असतांना ज्या योजना लागू असतात त्या योजना निवृत्त झाल्यावर देखील लागू होतील यासाठी आम्ही यापुर्वी शासनाकडे मागणी केली होती आणि त्याची अंमलबजावणी करु असे आश्वासन छत्रपती संभाजीनगर येथे ५ वर्षापुर्वी त्यावेळचे मुख्यमंत्री व आजचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते.

## महसूल पथकावर हल्ला करणाऱ्या आरोपीना अटक करा

### तलाठी संघटनेचे बेमुदत काम बंद आंदोलन



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सरवर पिंपळगाव येथील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळु वाहतूक करणाऱ्या वाहनावर करवाई करण्यासाठी गेलेल्या महसूल पथकांवर मागील महिन्यात वाळू माफियांकडून जीवघेणा हल्ला झाला होता. सदर घटनेनंतर संमधीत हल्लेखोराविरोधात ग्रामीण पोलिस स्टेशन माजलगाव येथे मागच्या महिन्यात दि २९ मे २०२४ रोजी भारतीय दंड संहिता १८६०च्या कलम ३५३ ,३३२ ,३७९,५०४,५०६ ,१४३ , १४७,आणि १४९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा दाखल होऊन एक महिना झाला तरी ग्रामीण पोलिसांनी आरोपीस अटक केली नाही या बद्दल संघटनेच्या वतीने नाराजी व्यक्त केली जात आहे. या पूर्वी तालुक्यात अश्याच प्रकारच्या गुन्ह्यात आरोपीस अटक केली नव्हती.. आरोपीस अटक न केल्यामुळे महसूल पथकांवर वारंवार जीव घेणे हल्ले करण्याची वाळू माफियांची हिमत होत आहे. परिणामतः महसूल कर्मचारी यांच्यात असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. तलाठी संघटना माजलगाव यांनी तहसीलदार यांना जोपर्यंत आरोपी अटक होत नाही तोपर्यंत काम बंद आंदोलन करण्याचे निवेदन काल दि २८ जून रोजी दिले आहे. यावेळी निवेदन देताना तलाठी संघटनेचे अध्यक्ष रुपचंद आभारे , सहसचिव लक्ष्मण सोन्नर, मंडळ अधिकारी फुलचंद खाडे , रोहिदास बांगर , तलाठी रामेश्वर थापडे, व इतर तलाठी हजार होते. सध्या शेतकरी वर्गाला ७/१२ , ८अ आदी सह फेरफार ची गरज असल्याने त्यावर सदर आंदोलनाचा परिणाम होणार आहे. त्या मुळे सदरील घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन त्या हल्लेखोराणा तात्काळ अटक करावी अशी मागणी होत आहे

## स्टार हेल्थ विमा कंपनीला जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचा दणका

### अ‍ॅड.बालाप्रसाद सारडा यांच्या युक्तीवादाला यश

बीड । प्रतिनिधी

श्रीनिवास लासे यांनी स्टार हेल्थ अ‍ॅन्ड अलाईड इन्शुरंन्स कंपनी शाखा बीड यांच्याकडे स्वतःसाठी व कुटूंबियासाठी हेल्थ विमा उतरविला होता. दरम्यानच्या काळात लासे यांच्या वडिलांच्या आजारपणात दवाखाना व मेडीकल खर्चाचा विमा रक्कम देण्यास सदरील स्टार हेल्थ अ‍ॅन्ड अलाईड इन्शुरन्स कंपनीने नकार दिला यावेळी श्रीनिवास लासे यांनी जिल्हा ग्राहक आयोगामध्ये तक्रार दाखल केली असता त्या तक्रारीची दखल घेवून सदरील ग्राहक आयोगाचे अध्यक्ष श्री.हरीश गो.अडके व सदस्या सतिका ग.शिरदे यांनी स्टार हेल्थ अ‍ॅन्ड अलाईड इन्शुरन्स कंपनीला श्रीनिवास लासे यांना रक्कम देण्याचे आदेशित करुन विमा कंपनीला चांगलाच दणका दिला आहे. या प्रकरणी अ‍ॅड.बालाप्रसाद सारडा यांच्या युक्तीवादाला यश आले आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, विमाधारक श्रीनिवास लासे यांचे वडिलांची अचानक तब्येत बिघडल्याने त्यांना सिग्मा हॉस्पीटल छत्रपती संभाजीनगर येथे शरीक करण्यात आले व त्यांच्यावर उपचार करण्यात आले यावेळी उपचाराच्या खर्चासाठी सदरील विमा कंपनीशी लासे यांनी पत्रव्यवहार केला असता त्यांना रक्कम भेटून जाईल असे कंपनीने आश्वासित केले होते पैकी काही रक्कम मंजुर झाली असे देखील सांगितले होते परंतू पुढे काही दिवसांनी त्यांना त्यांचा सर्व विमा दावा नामंजूर केला आहे असे कळविले त्यामुळे नाराज होवून श्रीनिवास लासे यांनी जिल्हा ग्राहक आयोगामध्ये विमा कंपनीविरुद्ध ग्राहक तक्रार क्रमांक २३९/२०२३ अन्वये तक्रार दाखल केली होती. त्यानंतर ग्राहक आयोगाने विमा कंपनीला नोटीस बजावणी करुन त्यांचे म्हणणे ऐकून घेतले व त्यानंतर सर्व कागदपत्रांची पडताळणी करुन तक्रारदार यांना विमा नुकसान भरपाई रक्कम रुपये ८० हजार २४१ रुपये ५० पैसे अदा करण्यास तसेच त्यावर तक्रार दाखल केल्यापासून ८ टक्के व्याज व तक्रारीच्या खर्चापोटी आणि त्रासापोटी ५ हजार रुपये निकाल दिनांकापासून ४५ दिवसांच्या आत देण्याचे आदेशित केले आहे.यामुळे संबंधित विमा कंपनीला ग्राहक आयोगाचा चांगलाच दणका बसला आहे. सदरील तक्रारदार यांच्यातर्फे अ‍ॅड.बालाप्रसाद सारडा यांनी काम पाहिले.

## सोलार पंप व विद्युत मोटार चोरीचे प्रमाण वाढले

धारूर : तालूक्यातील आसोला शिवारात शेतातील विहरी वरील सोलार पंप व विद्युत मोटारी चोरणारी टोळी कार्यरत असून दोन सोलार पंप व चौदाते पंधरा विद्युत मोटारी चोरीस जाण्याच्या घटना घडल्या असुन पोलीस मात्र शेतकरी हतबल होऊन ही गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करत आहेत शेतकरी वर्ग मात्र या घटना मुळे हैरान झाला आहे.पोलिसानी या टोळीचा शोध घेऊन तात्काळ कारवाई करावी आशी मागणी या शेतकरी वर्गातून होत आहे. शेतकरी गतवर्षीचे दुष्काळी परीस्थीती मुळे हैरण असताना यावर्षी हंगाम चांगला होणार आशी परीस्थीती दिसत असताना आसोला शिवारात शेतातील विहरी इंधन विहरी वरील विद्युत पंप चोरून नेणारी टोळी सक्रीय झाली असून महीण्यात पंधरा पेक्षाजास्त विद्यूत पंप चोरण्याचे घटना घडल्या आहेत. आसोला शिवारातील सचिन नामदेव आगे यांची स्पेन कंपणीचा सोलार पंप तसेच १४ ते १५ शेतकऱ्यांचे विहरी व इंधन विरीरी वरील विद्युत मोटर व विद्युत पंप महीणा भरात चोरीस गेले असून या मध्ये उत्तम दशरथ वाव्हळ यांचे तीन विद्युत पंप दिलीप विठ्ठल चोले यांचे दोन तर भागवत हरीभाऊ चोले,गणेश सिरसट,लिंबा लांडगे, हनंमत बोबडे वैजनाथ बोबडे, मेघराज बोबडे, सपंत्ती आंकुशे अंकुश चोले यांचे प्रत्यैकी एक विद्युत पंप चोरीस गेला असून पोलीसात तक्रार दिली तरी कारवाईस टाळाटाळ केलीजात आहे. पोलीस यंत्रणेणे तात्काळ हि टोळी पकडून शेतकऱ्यांची भिती दुर करावी आशी मागणी शेतकऱ्यां कडुन होत आहे.


## जाहीर प्रगटन

बीड जिल्हा व परिसरातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार सुरेश वकंर कापसे, रा. खंडेश्वरी, बीड, ता.जि. बीड यांनी दिलेल्या माहिती व सूचनेवरून व दाखवलेल्या कागदपत्रांवरून व अधिकृत केल्यावरुन मी सर्वांच्या माहिती करिता हे जाहीर प्रगटन देत आहे की, शेख लड्डु शेख अपिल, रा. खंडेश्वरी, बीड, ता. जि. बीड यांचे मालकी व ताब्यातील बीड नगर परिषद हद्दिचे आतील सर्वे नं. ११३ तरफ बोबडे, न.प. मालमत्ता क्र. नवा १८३ व जुना १८३ मधील सहन प्लॉट ज्याची साईज पुर्वपश्चिम ३३ फुट व दक्षिण उत्तर ३३ फुट ज्ये एकूण क्षेत्रफळ १०८९ चौ. फुट. आहे. चतुः सिमा - पूर्वेस - रस्ता, पश्चिमेस इंदुबाई यांचे घर, दक्षिणेस बबन अईवाळे यांचे घर, उत्तरेस बाबासाहेब भालेराव यांच घर अशी चतुःसिमा आहे. उपरोक्त वर्णनाचा प्लॉट / मिळकत मालकाने माझे पक्षकार यांना असा विश्वास दिला आहे की, सदर प्लॉट / मिळकत ही पुर्णपणे निर्विवाद, निर्जोखीम, कोणत्याही न्यायालयात वाद चालु नाही अथवा प्रलंबीत नाही तसेच कोणत्याही राष्ट्रीयकृत, सहकारी बँक पत संस्था अथवा खाजगी व्यक्तींचा कर्ज व पोटगीचा बोजा नाही. तसेच सदर प्लॉट / मिळकत संपादित झालेली नाही अथवा तशी नोटीस प्लॉट / मिळकत धारकास आलेली नाही. व सदर प्लॉट / मिळकत ही कोणत्याही स्थानिक संस्थेने रिजर्व्ह केलेला नाही. तसेच प्लॉट / मिळकत मालकाने माझे पक्षकारास आणखी असा विश्वास दिला आहे की, त्यांनी माझे पक्षकारा शिवाय ईतरांसोबत सदर प्लॉट / मिळकतीच्या संबंधाने भाडेपत्र, गहाणपत्र, इसारपावती, खरेदीखत, मृत्यूपत्र, बक्षीस पत्र अधिकार पत्र, इ. द्वारे मालकी हक्क व ताबा हस्तांतरणाचा व्यवहार केलेला नाही. तसेच सदर प्लॉट / मिळकत त्यांचे शिवाय त्यांचे वालीवारस व इतरांच्या कोणताही हक्क संबंध नाही तरी माझे पक्षकार याद्वारे सर्वांना सूचित करतात की, वरील प्लॉट / मिळकत खरेदी विक्री व्यवहार बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा व्यवहार, गहाण, दान, बक्षीस, विक्री, लीज, अधिकार व वारस हक्क तसेच काही आक्षेप अथवा हरकत किंवा हितसंबंध असल्यास हे जाहीर प्रगटन दिल्या पासून १० दिवसाचे आत संपूर्ण कागदपत्रासह खालील पत्यावर आपले आक्षेप हक्क संबंधाचे कागदपत्रासह लेखी स्वरुपात नोंदवावीत अन्यथा व्यवहारास कोणाचाही आक्षेप नाही असे समजुन कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखत करण्यात येईल व मुदती नंतर कोणाचाही आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

मार्फत :
अ‍ॅड. ए.के. कांबळे, बीड
मो.नं. ९८८१५६४७४८

जाहीर प्रगटन देणार मार्फत
स्वाक्षरित
सुरेश वकंर कापसे
रा. खंडेश्वरी, बीड, ता.जि. बीड
मो.नं. ८९९९५७७९१६

# ‘स्वाराती’ कर्मचारी निवासस्थानांची दुरावस्था

## दुरुस्त करून देण्याची डीवायएफआय व कर्मचाऱ्यांची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

‘‘स्वाराती‘‘ग्रामीण रुग्णालय व महाविद्यालय येथील कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय म्हणून रुग्णालय परिसरात निवासस्थाने उभारण्यात आले आहे. मात्र येथील निवास्थाने सोयी सुविधांच्या नावाने पूर्णपणे बोंबाबोब आहे. रुग्णालय व निवासस्थान देखभालीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्वतंत्र कार्यालय आहे.येथील अभियंता यांना वेळोवेळी भेटून,अर्ज,निवेदन देऊनही समस्या सोडविण्याची मागणी केली. मात्र समस्या आहे तशाच आहेत.त्यामुळे संघटनेच्या वतीने कार्यकारी अभियंता यांना निवेदन देऊन समस्या सोडवन्याची मागणी केली आहे. जर एक जुलै पर्यंत मागण्या पूर्ण नाही झाला तर कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन



करण्यात येणार असल्याचे निवेदनही देण्यात आले आहे.

कर्मचाऱ्यांची निवासाची सोय म्हणून रुग्णालय परिसरात निवासस्थाने उभारण्यात आले आहे. मात्र येथील निवास्थाने सोयी सुविधांच्या नावावर पूर्णपणे बोंबाबोब आहे.या निवासथानामध्ये राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना रुग्णसेवेचा कना म्हणून संबोधल्या जाते.मात्र या निवासस्थानामध्ये राहणे म्हणजे यातना सहन करण्यापेक्षा कमी नसल्याचा अनुभव येतो. याची देखभाल दुरुस्तीची जवाबदारी असणारा सार्वजनिक बांधकाम विभाग मात्र पूर्णपणे निद्रावस्थेत असल्याचे चित्र आहे. या भागामध्ये एन्ट्री करताच सर्वत्र झाडाझुडपांनीच स्वागत होते. झाडे-झुडपांचे साम्राज्य वाढले आहे. दरवाजे खिडक्या मोडकळीस आले आहे. भिंतीवरती मोठमोठी झाडे उगवली आहे. त्यानंतर थोडे आत गेल्यास सर्वत्र अस्वच्छता नजरेस पडते, येथे राहण्यासाठी असणाऱ्या खोल्यांमध्ये प्रवेश केल्यास रंग उडालेल्या भिंती, केवळ नावापुरत्या लागलेल्या खिडक्या दरवाजे, खोल्यांमधील तुटलेले नळ, बंद असलेले शौचालयाचे चेंबर, असेच चित्र खोल्यांमधे पाहायला मिळते.हे निवस्थान एकप्रकाराचे यातना गृह बनले आहे. कोट्यवधी रुपये खर्चून तयार करण्यात आलेल्या या निवासस्थानांची देखभाल दुरुस्ती अभावी पूर्णपणे वाट लागली आहे.याबाबत येथील अभियंता यांना वेळोवेळी भेटून,अर्ज,निवेदन देऊनही समस्या सोडविण्याची मागणी केली. मात्र समस्या आहे तशाच आहेत.त्यामुळे डी वाय एफ आय या संघटनेच्या वतीने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सदरील निवेदनावर डी वाय एफ आय चे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चंदनशिव तालुका अध्यक्ष देविदास जाधव तालुका सचिव प्रशांत मस्के संतोष केंद्रे आदींच्या सह्या आहेत.

# आष्टी नगरपंचायतच्या दिव्यांगाच्या खात्यात ५% निधी जमा



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी नगरपंचायत स्वउतपन्नातील ५ टक्के राखीव निधी दिव्यांगाच्या खात्यात नगरपंचायतच्यावतीने नगराध्यक्ष जिया बेग,सामाजिक कार्यकर्ते गणेश शिंदे मुख्याधिकारी बाळदत्त मोरे,लेखापाल प्रकाश हरकाळ यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.हा निधी मिळाल्यानंतर दिव्यांगात उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते.

आष्टी नगरपंचायत हद्दीतील दिव्यांग व्यक्तींना नगरपंचायतच्या स्वउत्पन्नातून दिव्यांग कल्याणसाठी राखून ठेवलेल्या ५ टक्के अनुदानाचे एकूण

**नगराध्यक्ष जिया बेग,गणेश शिंदे,मुख्याधिकारी मोरे यांच्या हस्ते धनादेश वितरित**

६१ दिव्यांग लाभार्थ्यांच्या खात्यात निधी आष्टी नगरपंचायतच्यावतीने वितरित करण्यात आला.यावेळी आष्टी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे, पत्रकार गणेश दळवी,पत्रकार शरद रेडेकर,शिवकुमार तांबे,संजय निकाळजे,रुपाली योगे,चंद्रकांत जपलवार, रोहिणी पोतदार, सतीश घोडके, विशाल म्हस्के,विद्या शिंदे,अशोक गायकवाड, छाया धोंडे,सुधाकर देशमुख,निलेश पवार यांच्यासह नगरपंचायत कर्मचारी व दिव्यांग उपस्थित होते.

# सोमवारी लोकशाही दिन

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक १ जुलै, २०२४ रोजी सकाळी १०-०० ते दुपारी १२-०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा.

लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत.

# माजलगाव येथे ६० खाटांचे स्त्री रूग्णालयास मंजुरी – आ. सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथे अनेक वर्षांपासून स्त्री रूग्णालयाची मागणी होती, अखेर ही मागणी मान्य झाली असून लवकरच माजलगाव येथे ६० खाटांचे नव्याने स्त्री रूग्णालय सुरू होईल या संदर्भात माजलगाव शहराची व परिसरातील दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता माजलगाव शहरालगत व परिसरातील महिलांसाठी ६० खाटांचे रूग्णालय सुरू झाल्यास या भागातील स्त्रीयासाठी दररोज डिलेव्हरी, सिर्जर, कुटुंब कल्याण कॅम्प व महिलांच्या इतर आजारांवर या ठिकाणी वेळेच उपचार होतील व २४ तास प्रसृती होणार असून यामुळे या भागातील



गरजुवंत महिलांना बीड, अंबाजोगाई येथील रूग्णालयात जाण्याची आवश्यकता पडणार नाही. या मुळे ६० खाटांचे स्त्री रूग्णालयास मंजुरी मिळाल्याबद्दल आ. प्रकाशदादा सोळंके यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे व माजलगाव तालुक्यातील नागरिकांनी आ. प्रकाशदादा सोळंके यांचे आभार मानले.

# अनिकेत भिलेगावकर यांना मातृशोक

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगावचे पत्रकार अनिकेत भिलेगावकर यांच्या आई तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रदिप भिलेगावकर यांच्या पत्नी



अलका भिलेगावकर यांचे गुरुवारी रात्री निधन झाले. त्या ५४ वर्षाच्या होत्या.त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

अलका भिलेगावकर या मागच्या काही काळापासून आजारी होत्या. त्यांच्यावर माजलगाव येथे खाजगी रुग्णालयात उपचार सुरु होते. गुरुवारी रात्री त्यांनी अखेरचा श्वास घेतला. एक सोज्वळ, कुटुंबवत्सल व्यक्ती म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनामुळे हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पती सेवानिवृत्त मुख्याध्यापक प्रदिप भिलेगावकर, मुले अनिकेत आणि आकाश असा परिवार आहे.



**बीड : जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी मा.श्री अविनाश पाठक साहेब यांच्या हस्ते गोगलगायी या किडीच्या नियंत्रणासाठी कृषि विभाग मार्फत राज्यस्तरावरून प्राप्त मेटाल्डीहाईड या औषधाचे वितरण श्री.अंबादास अभिमान डोईफोडे,रा.डोईफोडवाडी तसेच बालासाहेब विश्वनाथ मस्के नेकनुर ता.जी.बीड शेतकरी यांना करण्यात आले. यावेळी श्री बाबासाहेब जेजुरकर,जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,बीड श्री.गणेश वाघ तंत्र अधिकारी, श्री.बाबासाहेब राठोड कृषि पर्यवेक्षक,श्रीमती रेश्मा जाधव कृषि पर्यवेक्षक, श्री सुंदर खाडे वरीष्ठ लिपिक, श्रीमती स्वप्ना चटाले कृषि सहाय्यक श्री. वैजनाथ राऊत ,श्री.सय्यद के.आय, श्री शेख नुमान तंत्र सहाय्यक विस्तार हे उपस्थीत होते.**

# दगडफेकीच्या प्रकारानंतर मातोरी गावात तणावपूर्ण शांतता

## पोलीस प्रशासनाचा तगडा बंदोबस्त; प्रसार माध्यमांची मोठी वर्दळ

**शिरूर । शंकर भालेकर**

तालुक्यातील माळेगाव चकला आणि घोगस पारगाव येथील ओबीसी समाज बांधवांनी प्रा.लक्ष्मण हाके यांच्या अभिवादन दौऱ्यामध्ये सामील होण्यासाठी गुरुवार दि. २७ जून रोजी डीजे वाजवत मोटार सायकलची रॅली काढली होती. गेवराई तालुक्यातील पाडळसिंगीकडे ही रॅली जात असताना मनोज जरांगे पाटील यांच्या जन्मभूमी मातोरी गावात स्टॅन्ड वरती या रॅलीने ब्रेक घेत डीजे वाजवून घोषणाबाजी केली. ओबीसी बांधवांनी जरांगे पाटलांच्या गावात केलेली घोषणाबाजी ही मराठा समाजाच्या जिव्हारी लागली. काही लोकांनी पुढे येऊन रॅली पुढे जाऊ द्या अशी विनंतीही केली असल्याचे समजते . मात्र दोन्ही गटातील अति उत्साही लोकांकडून तू.. तू..मी..मी करण्यात आले, वाद चिघळला या वादातूदोन गटांमध्ये दगडफेक करण्यात आली. रॅली मधील मोटारसायकलची तोडफोडही करण्यात आली. प्राथमिक अंदाजानुसार पाच ते सात लोक यात जखमी झाले असल्याचेही माहिती समोर आली होती. यामुळे मातोरी गाव व परिसरामध्ये रात्री ७:३० वाजल्या पासून दोन्ही गटातील लोकांकडून तणावाचे वातावरण निर्माण करण्यात आले होते. गाड्यांची तोडफोड आणि अंधारामध्ये झालेली दगडफेक यामुळे मातोरी गावामध्ये दंगल सदृश्य स्थिती निर्माण झाली होती. सदरील घटनेची माहिती चकलांबा पोलिसांना होताच पोलीस प्रशासनाच्या वतीने या ठिकाणी धावपळ करत मोठा बंदोबस्त देण्यात आला. प्रसंगाचे गांभीर्य पाहून बीडचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांनी ही रात्री नऊ वाजल्यापासून मातोरी गावांमध्ये तळ ठोकला होता. तर गुरुवारी मध्य रात्री संभाजीनगर पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्रा यांनीही घटनास्थळी भेट दिली व पोलीस प्रशासनाला खडा बंदोबस्त देण्याचे आवाहन केले. तर इकडे लक्ष्मण हाके यांचा अभिवादन दौरा भगवान गडाकडे रात्री खूप उशीर झाल्याने हाके व वाघमारे यांच्या सत्कारासाठी शिरूर तालुक्यातील फुलसांगवी फाटा, शिंगारवाडी फाटा, तिंतरवणी, बोरगाव फाटा, घोगस पारगाव, ओबीसी बांधवांनी गर्दी केली होती. मात्र मातोरी इथे वाद चिखळल्यानंतर जागोजागी तणावाचे वातावरण निर्माण झाले. अनेक ठिकाणी गाड्या ही फोडण्यात आल्या वाहनांची तोडफोड करण्यात आली होती. रात्रीचे काही विपरीत घडते की काय असा प्रत्येकांना धाक होता. याच धाका पोटी पोलीस प्रशासन ही सज्ज होते. पोलीस प्रशासनाकडून वेळीच दखल घेतल्याने हा वाद सकाळपर्यंत आला. मात्र शुक्रवारी सकाळपासूनच पोलीस प्रशासनाची दोन पथके तैनात होती. सदरील घटनेची सोशल मीडिया मार्फत माहिती मिळाल्याने प्रसार माध्यमासाठी चर्चेचा विषय बनल्यामुळे पोलीस प्रशासनाच्या बंदोबस्त आणि प्रसार माध्यमांची वर्दळ यामुळे मातोरी गावाला शुक्रवारी सकाळी छावणीचे स्वरूप आले होते. पोलिसाच्या बंदोबस्तामुळे सद्यस्थितीमध्ये तणावपूर्ण शांतता असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

### तिंतरवणी कडकडीत बंद

**मातोरी गाव मध्ये झालेल्या दगडफेकीचा निषेध म्हणून तालुक्यातील तिंतरवणी हे गाव ओबीसी समाजाकडून शुक्रवार सकाळपासून कडकडीत बंद ठेवण्यात आले आहे.**

### आ.सुरेश धस यांच्याकडून शांततेचे आवाहन

**मातोरी गावातील घटनेमुळे समाजामध्ये अधिक तेड निर्माण होऊ नये यासाठी आष्टी पाटोदा शिरूर विधानसभा मतदार भाजपा नेते तथा विधान परिषद सदस्य सुरेश धस यांनी मातोरी ग्रामस्थांना भेट देऊन सामाजिक सलोखा राखण्यासाठी शांतता बाळगण्याचे आवाहन केले आहे.**

# गाईच्या दुधासाठी ५ रुपयाचे 1 जुलैपासून अनुदान

## माजी आ.सुरेश धस यांच्या मागणीला यश

आष्टी । प्रतिनिधी

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज दुसरा दिवस आहे.अर्थमंत्री अजित पवार विधानसभेत महाराष्ट्राचा अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला.त्यात माजी आ. सुरेश धस यांनी दुधाला किमान पाच रुपये तरी भाव वाढवून द्या अशी मागणी केली होती.त्यावर राज्य शासनाने राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात गाईच्या दुधासाठी ५ रुपयाचं अनुदान प्रति लिटर देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.त्यामुळे माजी आ.सुरेश धस यांच्या मागणीला यश आल्याने शेतरीवर्गामधून समाधान मानले जात आहे.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज दुसरा दिवस आहे.अर्थमंत्री अजित पवार



विधानसभेत महाराष्ट्राचा अतिरिक्त अर्थसंकल्पात पेट्रोल व डिझेल वरील मुल्यवर्धित कर राज्यभरात समान करण्याची तरतूद केली आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळणार आहे. या अर्थसंकल्पात पाच केंद्रीय सशस्त्र दलातील जवानांना व्यवसाय करातून सूट, मुद्रांक शुल्क दंडात कपात, मुद्रांक शुल्क परतावा आदी माध्यमातून नागरिकांना दिलासा देण्यात आला आहे.या मध्ये शेतरीवर्गामधून दुधाचे भाव वाढावे म्हणून माजी आ.धस गाईच्या दुधासाठी ५ रुपयाचे अनुदान द्यावे अशी मागणी राज्य शासनाकडे केली होती.यावर विचार करत राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांसाठीही घोषणा करण्यात आल्या आहेत.राज्यात गाव तिथे गोदाम या योजनेची घोषणा करण्यात आली आहे.त्यासाठी ३३१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.तसेच कापूस, सोयाबीन शेतकऱ्यांना प्रती हेक्टरी ५०० रुपये देण्यात येणार आहेत. व गाईच्या दुधासाठी ५ रुपयाचं अनुदान प्रति लिटर देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. १ जुलैपासून हे अनुदान दिले जाणार आहे.

# शेतीची वाढीव पाणीपट्टी कर रद्द करा –प्रा.ईश्वर मुंडे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील शेतकरी विविध





अडचणींने त्रस्त आहे.मागील दोन वर्षापासून महाराष्ट्रातील अनेक तालुक्यांत दुष्काळ आहे.या वर्षी ही पर्जन्यमान साधारण स्वरूपाचे आहे. अशांमध्येच महाराष्ट्र शासनाने शेतीसाठी वापरण्यात येणाऱ्या पाणी पट्टीत करात १० % वाढ करून शेतकऱ्यांवर सुलतानी संकट लादलेले आहे. तरी सदरील वाढीव पाणी पट्टी कर तात्काळ रद्द करावा.अन्यथा शेतकऱ्यांना सोबत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जन आंदोलन केले जाईल असा ईशारा सेवानिवृत्त अधिकारी विभागाचे महाराष्ट्र राज्य प्रमुख प्रा.ईश्वर मुंडे व भटके विमुक्त विभागाचे प्रदेश प्रवक्ते श्रीराम मुंडे यांनी ना.एकनाथ शिंदे,मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना मा.अविनाश पाठक,जिल्हाधिकारी,बीड यांचे मार्फत निवेदनाद्वारे दिला आहे.

# नायपर-जेईई परीक्षेत आदित्य शिक्षण संस्थेचे पाच विद्यार्थी उत्तीर्ण

## राष्ट्रीय पातळीवर फार्मसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

प्रतिनिधी । बीड

भारत सरकार तर्फे चालवल्या जाणाऱ्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च या उच्च दर्जाच्या फार्मसी शिक्षणाकरिता जगभर प्रसिद्ध असलेल्या सात सरकारी संस्था भारतात मोहाली-चंदिगड, कोलकाता, अहमदाबाद, रायबरेली, हाजीपुर, गुवाहाटी व हैदराबाद ह्या ठिकाणी आहेत. उच्च शिक्षणासाठी येथे प्रवेश मिळविण्याकरिता नायपर-जेईई परीक्षा



अमोल गिरी | जयदीप नागणे | प्रथमेश परकळे | नम्रता बोंबले | आकाश फुगनार

अत्यंत महत्त्वाची मानली जाते. या परिक्षेत आदित्य शिक्षण संस्थेच्या फार्मसी महाविद्यालयाचे तब्बल पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या परिक्षेत आदित्य शिक्षण संस्थेच्या फार्मसी महाविद्यालयाचे तब्बल पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

आदित्य शिक्षण संस्थेच्या फार्मसी महाविद्यालयाचे विद्यार्थी अमोल गिरी, जयदीप नागने, प्रथमेश परकळे, नम्रता

# पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्याबद्दल वादग्रस्त पोस्ट

**परळी । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर अनेक तरुण फेसबुक, इंस्टाग्राम या सारख्या समाज माध्यमाचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर करत असून वादग्रस्त पोस्ट करणाऱ्या विरोधात पोलिसांची करडी नजर राहली आहे.भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे पाठोपाठ आता राज्याचे कृषिमंत्री तथा बीड चे पालकमंत्री असलेले ना.धनंजय मुंडे यांच्याबद्दल फेसबुकवर वादग्रस्त पोस्ट केल्याप्रकरणी परळी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार पाटोदा तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस वापरकर्त्याने राज्याचे कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.धनंजय मुंडे यांच्या फोटोसमोर विद्या बालन अभिनेत्रीचा फोटो टाकुन त्यावर अधुरी कहानी चित्रपटाचा नायक, बीडचा इमरान अश्मी या आशयाची वादग्रस्त पोस्ट प्रसारित करून जाणीवपूर्वक ना.मुंडे यांची बदनामी करण्याच्या प्रयत्न केला.या प्रकरणी कण्हेरवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते राजेश श्रीरंग फड यांच्या तक्रारी वरून परळी शहर पोलीस ठाण्यात गुरनं १०२/२०२४ कलम ५००,५०५ (२) भादवि सहकलम ६६ (सी) माहिती तंत्रज्ञान कायद्यानव्ये फेसबुक पेज पाटोदा तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस वापरकर्ता यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणी अधिक तपास ठाण्याचे पोलीस निरीक्षक लोहकरे हे करीत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पालखी सोहळ्यानिमित्त पुणे शहरातील वाहतुकीत बदल

**पुणे । प्रतिनिधी**

संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे रविवारी पुण्यात आगमन होणार असून त्यानंतर पालखीचा मुक्काम असणार आहे. पालखी आगमनावेळी शहरातील प्रमुख रस्ते रविवारी दुपारनंतर आवश्यकतेनुसार वाहतुकीस बंद ठेवले जाणार आहेत. शहरातील वाहतुकीमध्ये बदल करण्यात येणार असल्याने वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन शहर पोलिसांच्या वाहतूक शाखेने केले आहे.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळा पिंपरी चिंचवड येथून रविवारी दुपारनंतर पुण्यात दाखल होईल. त्यामुळे बोपोडी चौक, खडकी रेल्वे स्थानक, मरिआई गेट चौक, कमल नयन बजाज चौक, जुन्या मुंबई - पुणे महामार्गावरील वाकडेवाडीपर्यंतचा रस्ता वाहतूक बंद असेल. तर संत ज्ञानेश्वर महाराज पालखीसाठी कळस फाटा ते विश्रांतवाडी चौक, येरवड्यातील मनोरुग्णालय (मेंटल कॉर्नर) ते आळंदी रस्ता चौक, चंद्रमा चौक ते आळंदी रस्ता, नवीन डॉ. आंबेडकर सेतू ते चंद्रमा चौक, होळकर पूल ते साप्रस चौकीपर्यंत वाहतूक बंद राहील. या कालावधीत आळंदीकडे जाणारे रस्ते आवश्यकतेनुसार बंद राहतील. तर अन्य रस्ते सुरू राहतील.



दरम्यान, पाटील इस्टेट परिसरापासून दोन्ही पालख्या एकाच मार्गावरुन मुक्कामस्थळी पोचतील. अभियांत्रिकी महाविद्यालय चौक, संचेती चौक, वेधशाळा चौक, वीर चापेकर चौक, ज्ञानेश्वर पादुका चौक, तुकाराम पादुका चौक, गोखले स्मारक चौक (गुडलक), खंडोजी बाबा चौक, टिळक चौक, लक्ष्मी रस्ता, विजय चित्रपटगृह चौक, सेवासदन चौक, बेलबाग चौक, बुधवार चौक, पासोड्या विठोबा मंदिर, मोती चौक, सोन्या मारुती चौक, हमजेखान चौक, डुल्या मारुती चौक, नाना पेठ पोलिस चौकी येथून श्री संत तुकाराम महाराज यांची पालखी अरुणा चौक मार्गे नाना पेठेतील श्री निवडुंगा विठ्ठल मंदिरात मुक्कामी असेल. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी अशोका चौकमार्गे भवानी पेठेतील श्री पालखी विठोबा मंदिर येथे मुक्कामास येईल. पालख्यांच्या मुक्कामानिमित्त नाना-भवानी पेठेतील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहेत.

## पालखी आगमन व मुक्कामामुळे वाहतुकीस बंद रस्ते - पर्यायी मार्ग

गणेशखिंड रस्ता (रेंजहिल्स कॉर्नर चौक ते संचेती रुग्णालय) पर्यायी मार्ग - रेंजहिल्स- खडकी पोलिस ठाणे, पोल्ट्री चौक, जुना मुंबई पुणे महामार्ग आणि रेंजहिल्स, सेनापती बापट रस्ता, विधी महाविद्यालय रस्ता

फर्ग्युसन महाविद्यालय रस्ता ( खंडोजीबाबा चौक ते वीर चापेकर चौक) पर्यायी मार्ग- कर्वे रस्ता, सेनापती बापट रस्ता, रेंजहिल्स

छत्रपती शिवाजी महाराज रस्ता (गाडगीळ पुतळा ते स. गो. बर्वे चौक) पर्यायी मार्ग - कुंभार वेस, मालधक्का चौक, आरटीओ चौक, जहागीर हॉस्पिटल, बंडगार्डन रस्ता

टिळक चौक ते वीर चापेकर चौक, पर्यायी मार्ग- शास्त्री रस्ता, म्हात्रे पूल, लक्ष्मी रस्ता (बेलबाग चौक ते टिळक चौक), पर्यायी मार्ग- शिवाजी रस्ता, हिराबाग टिळक रस्ता, शास्त्री रस्ता

शास्त्री रस्त्यावरील सेनादत्त पोलिस चौकी ते खंडोजीबाबा चौक रस्ता बंद

# वाहनाच्या धडकेने शाळकरी विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू

**दौंड । प्रतिनिधी**

बिरोबावाडी (ता. दौंड) येथील पाटस-दौंड अष्टविनायक महामार्गावर दुसरीत शिकणाऱ्या लहान बालकाला चारचाकी पिकअपने धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. यामुळे परिसरातील वातावरण तापले असल्याने नागरिकांनी रस्ता बंद केला. त्यामुळे रस्त्यावर वाहतुकीच्या लांब रांगा लागल्या आहेत.

अपघातात मृत्युमुखी पडलेल्या शाळकरी विद्यार्थ्याचे नाव आयुश राजेश यादव (वय ८) असे आहे. ही घटना बिरोबावाडी येथील अष्टविनायक रस्त्यावरील मुख्य चौकात घडली. याच चौकात जिल्हा परिषद शाळा आहे. त्याची आई मुलीला व मुलाला शाळेत सोडण्यासाठी जात असताना पाटसवरून दौंड दिशेने वेगात जाणाऱ्या पिकअपने रस्ता क्रॉस करत आसता विद्यार्थ्याला जोराची धडक दिल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. शाळेच्या चौकात अष्टविनायक महामार्गावर गतिरोधक करण्याची मागणी यावेळी संतप्त नागरिकांनी केली. यामुळे त्यांनी दौंड पाटस अष्टविनायक रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवला आहे.. यामुळे रस्त्यावर वाहनांच्या लांब रांगा लागल्या आहेत. घटनेची माहिती मिळताच यवत पोलीस निरीक्षक नारायण देशमुख घटनास्थळी दाखल झाले असून नागरिकांना शांत करण्यासाठी यवत, पाटस पोलिस प्रयत्न करीत आहेत.

# रोटरी क्लब निगडीकडून मेमोग्राफी मशीन भेट

पिंपरी(प्रतिनिधी) गरीब महिलांचे अल्पदरात स्तन कर्करोगाचे निदान होण्यासाठी रोटरी क्लब निगडीच्या वतीने एन्प्रो इंडस्ट्रीजच्या सहकार्याने आळंदी येथील इंद्रायणी रुग्णालय आणि कँसर इंस्टिटयूटला मॅमोग्राफी मशीन भेट देण्यात आली.



यावेळी अध्यक्ष हरबिंदर सिंग, एन्प्रो इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक श्रीकृष्णा करकरे,, अलका करकरे,कल्याणी कुलकर्णी

फर्स्ट लेडी कमलजीत कौर, इंद्रायणी रुग्णालयाचे मुख्य विश्वस्त डॉ संजय देशमुख, सचिव मुकुंद देशपांडे,निगडी क्लबचे ग्लोबल ग्रँट संचालक डॉ. शुभांगी कोठारी, वैद्यकीय संचालक डॉ अमोल मेहता,राणू सिंघानिया, राकेश सिंघानिया

मुकुंद मुळे, रुग्णालयाचे विश्वस्त अनिल पत्की,वैद्यकीय संचालक डॉ राजीव जोशी आदी उपस्थित होते.

डॉ. देशमुख म्हणाले कि, स्त्रीयांमध्ये भारतातील सर्वात सामान्य कर्करोग म्हणजे स्तनाचा कर्करोग आहे. २०२२ मध्ये १,९२,०२० नवीन प्रकरणे नोंदवली गेली. ज्यामध्ये स्त्रियांमधील सर्व नवीन कर्करोगाच्या प्रकरणांपैकी २६.६% समाविष्ट आहेत. हा कर्करोगामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या बाबतीतही प्रमुख कारण असून या कर्करोगामुळे २०२२ मध्ये ९८,३३७ मृत्यू नोंदवले गेले आहे.

क्लबचे अध्यक्ष यांनी निगडी क्लब करीत असलेल्या वेगवेगळ्या प्रकल्पांबाबत माहिती दिली. डॉ.कोठारी म्हणाल्या कि,बदलती जीवनशैली,पोषक आहार आणि व्यायामाचा अभाव, हार्मोन्स बिघडतेले संतुलन, लग्नाचे वाढते वय, प्रदूषण यामुळे कर्करोगाचे प्रमाण वाढले आहे.

# आरक्षणाच्या मुद्यावर सरकारची भूमिका संशयास्पद- राज राजापूरकर

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य सरकारमधील मंत्री तथा सरकारमधील नेत्यांच्या वतीने मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षणाचा विषय ज्याप्रमाणे हाताळत आहे. या संदर्भातील सरकारची भुमिका संशयास्पद आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार पार्लमेंटरी बोर्ड सदस्य तथा ओबीसी विभाग प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर म्हणाले की, राज्यात एकीकडे मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळावे म्हणून आंदोलन सुरू होते. त्यांनतर आता ओबीसीतून आरक्षण मिळू नये म्हणून आंदोलन केले जात आहे. हे आदोलन सांभाळताना सत्तेतील लोक समाजात तेढ निर्ज्ञाण करण्याचा प्रयत्न करत आहे. यात सरकारची भुमिका महत्वाची आहे. सरकारने नोंदी शोधल्या, प्रमाणपत्र दिले. पण मला यात संशय येतो आहे. .ओबीसी आणि मराठा समाजाच्या आरक्षणाविषयी सरकारची भुमिका संशयास्पद आहे. कारण ते जातनिहाय जनगणना करत नाही. जातनिहाय जनगणना संदर्भात आम्ही वारंवार भूमिका स्पष्ट केली आहे. मात्र सरकारच्या वतीने जातनिहाय जनगणना करण्यावर सरकारकडून कुठलीही भूमिका स्पष्ट करण्यात येत नाही आहे. आम्ही जातनिहाय जनगणना व्हावी म्हणून आंदोलन करणार आहोत. जातीनिहाय जनगणनेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने आम्ही राज्यात ठीक ठिकाणी आंदोलन करणार आहे. तसेच अधिवेशना दरम्यान राज्य सरकारला विधानसभेवर जाऊन घेरावा देखील घालण्यात येईल. ओबीसी आमचा डीएनए आहे असे म्हणणाऱ्या फडणवीस यांच्या वक्तव्याचा ओबीसी सेलच्या वतीने आम्ही निषेध व्यक्त करतो. कारण जेंव्हा ओबीसी आरक्षणाविषयी भुमिका घेण्याचा मुद्दा येतो तेंव्हा ते बोलत नाहीत. आरक्षणाच्या मुद्द्यावर फडणवीस नेहमीच वेळेनुसार वेगवेगळे वक्तव्य करत असतात. ओबीसी सेलच्या वतीने आम्ही देवेंद्र फडणवीस यांना अधिवेशनादरम्यान घेरावा घालणार आहे असे राज राजापूरकर यांनी सांगितले आहे.

सदर बैठकीचे सूत्रसंचालन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर सरचिटणीस सचिन गायकवाड यांनी केले शहर कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस प्रशांत सपकाळ, ओबीसी विभाग शहराध्यक्ष भाई विशाल जाधव, उपाध्यक्ष सागर भुजबळ, विधानसभा अध्यक्ष संतोष माळी, बिरुदेव मोटे, किरण ठोंबरे, अनिल भोसले,विवेक विधाते, आदी उपस्थित होते.



# बेकायदा बांधकाम भोवले; १४ आस्थापनांवर कारवाईचा बडगा

**पुणे । प्रतिनिधी**


कल्याणीनगर पोर्शे कार अपघातानंतर व पुण्यातील एल थ्री पबमधील ड्रग सेवन करतानाचे व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर शहरातील बेकायदेशीर बांधकाम झालेल्या आस्थापनांवर (हॉटेल, पब, बार, रेस्टॉरंट, क्लास) कारवाई सुरू करण्यात आली आहे.

महापालिकेचे नियम धाब्यावर बसवून त्यातच नोटीस बजावूनही अनधिकृत बांधकाम न काढणार्या हॉटेल, कॅफे, पब, बार तसेच इतर आस्थापनांच्या १४ आस्थापनांसह त्यांच्या मालकांवर विमानतळ पोलिस ठाण्यात पाच वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिल्या गुन्ह्यात विमाननगरमधील सीसीडी चौकातील वाइन्ड शुगर कॅफे, द ३ मस्केटिअर, थोरात बार्बेक्यू, चाटस न वेप्स, स्याश बार, द बानयार्ड कॅफे, टेल्स स्पिरिट हंटर बिस्ट्रो, पिंड पंजाब, द चाय कॅफे यांच्या मालकांवर कनिष्ठ अभियंता अभिषेक कुसाळकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२, ४३ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या आस्थापनांनी अनधिकृत वाढीव बांधकाम केल्याचे आढळल्यानंतर हा गुन्हा दाखल केला आहे.

# तलाठी सापडला लाचलुचपत प्रतिबंधक पथकाच्या सापळ्यात

लोणावळा : सातबारा उताऱ्यावरील गिनीगवत ही नोंद कमी करून दुरुस्ती नवीन सातबारा देण्यासाठी शेतकऱ्याकडे दहा हजार रुपयांची लाच मागत, ही लाचेची रक्कम स्वीकारताना खांडशी गावचे तलाठी यांना कार्ला मंडल कार्यालय या ठिकाणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले आहे. मंगळवारी (२५ जून) सायंकाळी ५.५० वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात अंकुश रामचंद्र साठे (वय ४३, तलाठी खांडशी सजा, रा. खटाव, सातारा) यांच्यावर भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, खांडशी सजा अंतर्गत असलेल्या एका शेतकऱ्याच्या सातबारा उताऱ्यावर गिनीगवत अशी नोंद झाली होती. ती नोंद कमी करत दुरुस्ती सातबारा उतारा बनवून देण्यासाठी तलाठी साठे यांनी १० हजार रुपयांची मागणी केली होती. ही रक्कम स्वीकारण्यासाठी त्यांनी कार्ला मंडल अधिकारी कार्यालय येथे शेतकऱ्याला बोलविले होते. दरम्यान शेतकऱ्याने याबाबत लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने पथकाने सापळा लावत तलाठी भाऊसाहेब यांनी लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडले आहे. या गुन्ह्याचा पुढिल तपास वरिष्ठांचा आदेशान्वये लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक प्रवीण निंबाळकर हे करत आहेत.

# शिवछत्रपती क्रीडापीठ अंतर्गत विविध क्रीडाप्रबोधिनी मध्ये २०२४-२५ साठी प्रवेश प्रक्रीया सुरू

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी राज्यातील प्रतिभावान खेळाडूंची निवड करुन त्यांना शास्त्रोक्त प्रशिक्षण, संतुलित आहार आणि अद्ययावत क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडापीठांतर्गत असलेल्या ९ क्रीडाप्रबोधिनीत सरळप्रवेश (५० टक्के) व कौशल्य चाचणी (५० टक्के) प्रक्रियेअंतर्गत निवासी व अनिवासी प्रवेश देण्यात येणार आहेत.

राज्यात पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपूर, औरंगाबाद,गडचिरोली अशा ९ ठिकाणच्या क्रीडा प्रबोधिनीमध्ये क्रीडा प्रशिक्षणार्थीची निवड करण्यासाठी प्रवेश प्रक्रीया राबविण्यात येणार आहे. ज्यूदो, जिम्नॅस्टीक्स, हॉकी, शुटींग, फुटबॉल, जलतरण, थलेटिक्स, कुस्ती, बॅडमिंटन, आर्चरी, हॅन्डबॉल, टेबलटेनिस, वेटलिप्टींग, ट्रायथलॉन, सायकलिंग आणि बॉक्सींग अशा १७ क्रीडाप्रकारात प्रशिक्षण देण्यात येईल.

सरळ प्रवेश प्रक्रियेसाठी क्रीडा प्रबोधिनीतील असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर पदक प्राप्त केलेले खेळाडू किंवा राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधीत्व केलेले १९ वर्षाआतील खेळाडूंची तज्ज्ञ समितीसमोर संबंधित खेळाबाबतची चाचणी घेवून प्रवेश निश्चित केला जातो.

खेळनिहाय कौशल्य चाचणी प्रक्रीयेअंतर्गत क्रीडा प्रबोधिनीत असलेल्या संबंधित खेळात राज्यस्तरावर सहभागी १९ वर्षाआतील खेळाडूंसाठी संबंधित खेळाच्या कौशल्य चाचणीचे आयोजन करुन गुणानुक्रमे प्रवेश दिला जातो. क्रीडा चाचण्यांमध्ये निवड झालेल्या खेळाडूंची वैद्यकीय पथकाद्वारे चाचणी घेवून क्रीडा प्रबोधिनीमध्ये शारीरिकदृष्टया सुदृढ खेळाडूंची निवड अंतिम करण्यात येते. पात्र खेळाडूंनी ५ जुलै २०२४ रोजी पूर्वी आपला प्रवेश विनंती अर्ज आवश्यक प्रमाणपत्र जोडून जिल्हा क्रीडा अधिकारी पुणे यांचेकडे द्यावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

# अनधिकृत पबला कुणाचा आशीर्वाद: सुषमा अंधारे

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहराची ड्रगच्या विळख्यातून सुटका व्हावी यासाठी उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी राजीनामा द्यावा. त्यांनी पाठवलेल्या नोटीसला आम्ही घाबरत नाही. पुण्यात केवळ अधिकृत २३ पब, बार आहेत, त्यांच्याकडे परवाना आहे. मग १०० पब, बार कोणाच्या आशीर्वादने चालतात, असा सवाल शिवसेनेच्या (ठाकरे) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे.

पुण्याची ड्रगच्या विळख्यातून सुटका व्हावी, तसेच मंत्री आणि अधिकार्यांनी राजीनामा द्यावा, या मागण्यांसाठी शिवसेनेकडून (ठाकरे) विभागीय आयुक्त कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले, त्या वेळी त्या बोलत होत्या. शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे आदी उपस्थित होते.

अंधारे म्हणाल्या, पुणे विद्येचे माहेरघर म्हटले जाते, पण आता याच पुण्यात कायदा व सुव्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. मंत्री देसाई कोणत्या तोंडाने तुम्ही नोटीस पाठवत आहात. नोटीस पाठवता मग कारवाई का होत नाही? राज्य उत्पादन शुल्क विभाग अधिकार्यांचे आणि मंत्र्यांचे लागेबांधे असल्याचा आरोपदेखील या वेळी अंधारे यांनी केला.त्या म्हणाल्या, पुण्यातील पब, बारची माहिती आमच्याकडे आहे, तर राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक चरणसिंग राजपूत कारवाई का करत नाहीत? राजपूत यांचे निलंबन करून कारवाई केली पाहिजे, त्यांची चौकशी केली पाहिजे. २३ अधिकृत पब बारव्यतिरिक्त इतर पब बारवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अंधारे यांनी केली.

# दरोड्याच्या प्रयत्नातील दोघांना पकडलं, तिघे फरार

## पुणे पोलिसांचा सिनेस्टाईल पाठलाग

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे : दरोड्याच्या घटनेवरुन पुण्यात चोर पोलिसांचा प्रत्यक्ष थरार रस्त्यावर पाहायला मिळाला आहे. या घटनेने पुण्यातील भोर पोलिसांनी(झे श्र ळ ल श) केलेल्या कारवाईची शहरात चांगलीच चर्चा होत आहे. विशेष म्हणजे गेल्या काही दिवसांपासून अपघात, ड्रग्ज आणि गुन्हेगारीच्या घटनांनी पुणे (झींपश) शहर हादरुन गेलं आहे. तर, विधिमंडळाच्या अधिवेशनातही आज पुण्यातील पोर्शे कार अपघात आणि ड्रग्ज प्रकरणावरुन खडाजंगी पाहायला मिळाली. त्यामुळे, पुण्यातील पोलीस यंत्रणा अलर्ट मोडवर असून गुन्हेगारीच्या प्रत्येक घटनेवर कारवाईला वेग आला आहे. त्यातच, आज सकाळी तळेगाव-दाभाडे येथील सराफाच्या दुकानावर दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या टोळीला पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करुन ताब्यात घेतलं आहे.



पुणे जिल्ह्यातील तळेगाव दाभाडे येथून सराफाच्या दुकानावर दरोडा टाकण्याचा प्रयत्न करून पळून जाणाऱ्या दरोडेखोरांना भोर-पोलिसांनी वडगाव डाळ हद्दीतून सिनेस्टाईल पाठलाग करुन ताब्यात घेतले आहे. या घटनेत पाच पैकी २ जणांना पकडण्यात पोलिसांना यश आलं असून तिघांनी पोलिसांना गाडीतून उतरून परिसरातील डोंगराच्या दिशेने काढला पळ काढला. तळेगाव दाभाडे येथे सकाळी एका सराफाच्या दुकानात ५ आरोपींनी दरोड्याचा प्रयत्न केला होता. मात्र, नागरिक आल्याने त्यांचा प्रयत्न फसला आणि त्यांनी त्या ठिकाणाहून पलायन केले होते. दरम्यान, याप्रकरणी घटनेची माहिती मिळताच भोर पोलिसांनी आरोपींच्या मागावर पथकं रवाना केली होती, पाचही आरोपी एका इनोव्हा मोटारीतून भोरकडे आल्याची माहिती तळेगाव दाभाडे पोलिसांनी भोर पोलिसांना दिली होती. त्यानंतर, भोर पोलिसांनी पाठलाग करुन दरोडेखोरांना ताब्यात घेतलं.

# बिबट्याच्या हल्ल्यात शिरोलीत शेळी जखमी

**जुन्नर । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यात बिबट्यांची दहशत कायम असून शिरोली बुद्रुक (ता. जुन्नर) येथे बिबट्याने दिवसाढवळ्या भरवस्तीत घुसून शेळीवर हल्ला केला. बिबट्याने गळयाचा चावा घेतल्याने शेळीच्या श्वासनलीका आणि अन्ननलिकेला गंभीर दुखापत झाली आहे. ही घटना शुक्रवारी (ता. २८) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास घडली.

शिरोली बुद्रुक येथील डांगरममळा वस्तीवरील छाया रमेश थोरवे यांनी आपल्या शेळ्या घरालगतच्या मोकळ्या शेतात बांधल्या होत्या. शेजारील कुटुंबात लग्न समारंभ असल्याने माणसांची वर्दळ होती. तरीदेखील बिबट्याने दुपारच्या वेळी मनुष्यवस्तीत शिरून शेळीवर हल्ला केला. रमेश थोरवे यांनी प्रसंगावधान दाखवून हातात काठी घेऊन आरडाओरडा करून बिबट्याला हाकलून लावण्याचा प्रयत्न केला. आजूबाजूचे लोकही आरडाओरडा करत धावून गेल्याने बिबट्याने शेळीला सोडून उसाच्या शेतात पळ काढला.

या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या परिसरात मोठ्या संख्येने बिबटे असून, त्याचा सर्वाधिक धोका शेतकऱ्यांना असून, पशुधनही धोक्यात आले आहे. शेतात वावरणे मुश्कील झाल्याने शेतीकामासाठी शेतमजूर मिळत नसल्याचे पहावयास मिळते. त्यामुळे वनविभागाने बिबट्यांचा त्वरित बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातील नागरिक करत आहेत.